# आणि ग्रंथोपजीविये

## २

## रामदास खरे



# या मित्रांनो! घेऊन जा! लुटा! लुटा! लुटून न्या!

# आणि ग्रंथोपजीविये-2

## हे पुस्तक फ़ुकट नाही

यामागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत.

पण तरीही आम्ही ते वाचकांना विनामूल्य घेऊ देतो.

कारण ई पुस्तक एकदा बनलं की एकजण वाचो वा एक लाख.

आमचं काहीच कमी होत नाही.

उलट आनंद वाढतो, मजा येते.

पण

तुम्ही ते फ़ुकट का घ्यावं?

तुम्हालाही काही देता येईल.

असे काही द्या ज्याने ई साहित्यच्या लेखकांना, टीमला आणि तुम्हाला आनंद मिळेल

आणि तुमचं काहीच कमी होणार नाही.

तुम्ही आशिर्वाद आणि शुभेच्छा द्या

लेखकांना फ़ोन मेल करून दाद द्या

आपल्या मित्रांचे मेल पत्ते आम्हाला द्या

मित्रांना आमच्याबद्दल मेल आणि Whatsapp करा

ई साहित्यचे फ़ेसबुक पेज, इन्स्टाग्राम, टेलिग्राम यांवर स्वतः जा व इतरांना आमंत्रित करा. सोशल मिडियावर ई साहित्यचा प्रचार करा.

सर्वात बहुमोल अशा तुमच्या सूचना द्या

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत ज्याने लेखकाला व ईसाहित्य टीमला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यास मदत होईल. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे व त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा. अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करत आहे

# आणि ग्रंथोपजीविये-२

लेखक : रामदास ग. खरे

# आणि ग्रंथोपजीविये-२

## लेखक : रामदास ग. खरे

**सी-२१३, चंद्रवदन सोसायटी क्र. १,**
**गणेशवाडी, कौशल्य हॉस्पिटल समोर**
**पांचपाखाडी, ठाणे-४०० ६०१.**
**भ्रमणध्वनी : ९८६९०१४३१९ आणि ७५०६२६०२७४.**
**इमेल : rgkhare64@gmail. com**

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखककाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957 read with Sections 43 and 66 of the IT Act 2000. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक: ई साहित्य प्रतिष्ठान :

www.esahity.com
esahity@gmail. com
eSahity Pratishthan
eleventh floor
eternity
eastern express highway
Thane. 400604

प्रकाशन : ९ ऑक्टोबर २०२१ (नवरात्र शके १९४३)

©esahity Pratishthan®2021

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

## *** लेखकाचा परिचय ***



## रामदास ग. खरे

जन्म:१३फेब्रुवारी१९६४, ठाणे. वाणिज्य शाखेची पदवी. तीस वर्षे बँकिंग क्षेत्रात काम. लेखनाबरोबरच चित्रकला, फोटोग्राफी, संगीत, दुर्गभ्रमंती, असे छंद जोपासत आहे. विविध क्षेत्रातील मान्यवर मंडळींची दुर्मिळ अशी ३५० हस्ताक्षर-पत्रे संग्रहित केली आहेत. जून २०१८ मध्ये आर्ट-प्रिव्हिलेज, ठाणे येथे पहिले सोलो पेंटिंग प्रदर्शन संपन्न झाले. विविध पुस्तकांची, नियतकालिकांची मुखपृष्ठे रेखाटली आहेत.

**प्रकाशित साहित्य** : कवितासंग्रह: स्पंदन (१९९४), जीर्णदेव्हारा (२००४), सी. टी. स्कॅन- (२०१५), आता अटळ आहे (२०२१).

**संकीर्ण** : कॅलिडोस्कोप -(लेख संग्रह) २०१७, पत्रसंवादु (लेख संग्रह)- २०१८, चरित्र लेखन: प्रभो शिवाजीराजा - २०१८, शूर आम्ही सरदार- २०१९, आणि ग्रंथोपजीविये भाग-१(२०२१)

**आगामी पुस्तके** : मणिकर्णिका... राणी लक्ष्मीबाई, स्मरण महाराष्ट्राचे, निमित्त भटकंतीचे, भारतीय संगीत वाद्ये, असे घडले गांधीजी... एकूण तीन भाग,

**सदर लेखन** : लोकसत्ता, गावकरी, लोकमत, महाराष्ट्र दिनमान.

**लाभलेले पुरस्कार :** अंकुर वाङ्मय पुरस्कार (२००४), शिवांजली साहित्य गौरव पुरस्कार, जुन्नर (२०१६), कोकण मराठी साहित्य परिषद, कल्याण शाखा आणि अक्षरमंच सामाजिक सांस्कृतिक प्रतिष्ठान - 'अक्षरगंध' पुरस्कार (२०१९), राज्यस्तरीय सूर्योदय काव्य पुरस्कार, जळगाव(२०२१)

विविध ठिकाणी संपन्न झालेल्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनात कविता सादरीकरण तसेच आकाशवाणी, मुंबई येथे कविता वाचन, कथा वाचन.




कव्हर क्लिका,
पुस्तक वाचा

## ** लेखकाचे मनोगत **



***पुस्तकं ठेवू नयेत कडेकोट बंदोबस्तात***

***नाहीतर त्यांना वाळवी लागते***

***आपल्यातील अज्ञानाची!***

एका भल्या सकाळी माझ्या घरातल्या बुक शेल्फवर उन्हाची कोवळी उन्हं रांगू लागली. नकळत ओळी सुचल्या आणि कविताही अलगद बाहेर पडली. महत्प्रयासाने मी जी ग्रंथसंपदा जमवली आहे त्यातील काही पुस्तके माझ्याशी त्यादिवशी चक्क बोलू लागली."*आम्हाला पुन्हा बाहेर काढा, आमच्यावर लिहा, शब्दांचा विचार गंध दूरवर पसरू दे, ज्ञानाचा तेजोनिधी तळपू दे.*"

तत्क्षणी मनाने काहीबाही ठरवले. येस. उत्तम पुस्तकाचा परिचय वाचकांना द्यायचा. अगदी सातत्याने. बुक शेल्फ मध्ये नजर

टाकताच एकेक पुस्तक आम्हाला बाहेर काढा असे म्हणू लागले. लोकमतचे संपादक श्री संदीप प्रधान यांना ही कल्पना सांगताच त्यांनी लगेच 'आगे बढो' असा ग्रीन सिग्नल दिल्यावर दर रविवारी लोकमतच्या 'हॅलो ठाणे' पुरवणीत पुस्तक परीक्षण झळकू लागले. शीर्षकाचे नाव : 'आणि ग्रंथोपजीविये'. वाचन संस्कृती वाढावी त्यासाठी वेगवेगळे उपक्रम आयोजित केले जातात. त्याचाच एक भाग म्हणून हे सदर सुरु केल्यावर वाचक रसिक या पुस्तकांकडे वळतील, वाचतील, त्यावर चर्चा करतील, इतकाच उद्देश. लेखमालेला वाचकांचा उदंड प्रतिसाद लाभला. माझा उद्देश सफल झाला. और क्या चाहिए. लेखमालेसाठी पुस्तकांची निवड अगदी जाणीवपूर्वक केली. जुन्या पिढीतल्या लेखकांबरोबरच सध्याची तरुण लेखक मंडळी काय लिहीत आहेत हेही जाणून घेणे आवश्यक होते. त्यामुळे तो विचार करूनच लेखमाला सुरु केली. सर्व साहित्यप्रकार, विषय यामध्ये समाविष्ट व्हावेत याचाही सूक्ष्म विचार केला. कविता, कथा, कादंबरी, चरित्र, संपादन, व्यक्तिचित्रण, मुलाखती, नाटक, ललित, संकीर्ण, स्फुटलेखन, प्रवासवर्णन, निबंध, संगीत, चित्रकला वगैरे अशा सर्व विषयांच्या, आशयांचा अंतर्भाव या लेखांतून केला.

***आणि ग्रंथोपजीविये, विशेषी लोकी इये ।***

***दृष्टादृष्टविजये, हो आवे जी ।।***

आपणा सर्वांना माहिती आहेच की 'आणि ग्रंथोपजीविये' या ओळीचा ज्ञानेश्वर माउलींच्या पसायदानात उल्लेख आहे. खूप पूर्वी म्हणजे साडेसातशे वर्षांपूर्वी मुद्रणकला अस्तित्वात नव्हती तरीही ग्रंथनिर्मिती होत असे. सुवाच्च हस्ताक्षर असलेल्या एखाद्या लेखनिकाची नेमणूक केली जात असे. त्या ग्रंथाची प्रत गावातील एखाद्या मोठ्या मंदिरात ठेवली जायची. त्याचे पठण होत असे. श्रोते जमत आणि ग्रंथातील विचार, प्रकाश सर्वदूर पसरे. अशा लेखनिक, निरुपणकार, पाठक, प्रवचनकार यांना या कामाचा मोबदला म्हणून धन किंवा वस्तू दिली जायची. म्हणजेच ही सारी मंडळी त्याकाळची ग्रंथोपजीवी होते असेच म्हणता येईल. हाच महत्वाचा विचार ज्ञानेश्वर माउलींनी आपल्या रचनेत प्रभावी पणे मांडला आहे. माउलींनी किती सुंदर अर्थ सांगितला आहे पहा”ज्यांनी ज्यांनी या ग्रंथाचे पालन, पठण केले आहे अशा सर्व लोकांना आपल्या दुष्ट, वाईट प्रवृत्तीवर विजय मिळवून ते समाधानी आणि सुखी व्हावेत.”

आज २०२१ उजाडले आहे. माध्यमे आणि तंत्रज्ञान झपाट्याने बदलत आहे. पण तरीही पुस्तकाचे महत्व जराही कमी

झालेले नाही. जग बदलत आहे. तत्व, निष्ठा अबाधित राखून प्रत्येकाने काळाच्या बरोबर जाणे हे व्यवहार्य आहे. या साऱ्याचा विचार करून 'आणि ग्रंथोपजीविये' हे पुस्तक ईबुक स्वरूपात काढले तर पुस्तकातील विचारांचा गंध जगभरात कुठेही पसरू शकतो. तोही एका क्लिक सरशी! अशाच एका विचार वळणावर अवचितपणे ई - साहित्य प्रतिष्ठानचे श्री सुनील सामंत यांचा परिचय झाला. त्यांच्याशी संवाद साधल्यावर सध्याच्या काळात ईबुक हा एक चांगला पर्याय असल्याचे मला जाणवले. त्यादृष्टीने तयारीही सुरु केली. ६ जानेवारी २०१९ ते २९ डिसेंबर २०१९ या कालावधीत लोकमतच्या 'हॅलो ठाणे' आवृत्तीत एकूण ३८ पुस्तक परीक्षणे प्रसिद्ध झाली. त्यानंतरच्या काळात लिहिलेली आणि सकाळ, रुची (ग्रंथाली) व इतरत्र प्रकाशित झालेली बारा अशी एकूण पन्नास परीक्षणे यांचे ईबुक करण्याचे ठरवले. श्री सुनील सामंत यांचे सूचनेनुसार या पन्नास लेखांचे चार भाग (प्रत्येकी १३ लेखांचे एक पुस्तक) करून चार ईबुक करण्याचे फायनल केले. लेखांसोबत त्या त्या पुस्तकाचे मुखपृष्ठ आणि प्रकाशकांचा तपशील देखील देण्यात आला आहे.

ज्येष्ठ कवी, समीक्षक, निरुपणकार श्री अरविंद दोडे यांना ही कल्पना आवडली आणि त्यांनी या माझ्या ईबुक साठी पाठराखण (Blurb) केली आहे. त्यांचे मनापासून आभार. लोकमतच्या ठाणे

कार्यालयाचे संपादक श्री संदीप प्रधान आणि स्नेहा पावसकर यांचे विशेष आभार. या प्रवासात सौ वृषाली शिंदे यांचीही मोलाची मदत झाली त्यांचेही आभार. आणि सर्वात महत्वाचे म्हणजे या ईबुकमध्ये समाविष्ट झालेल्या सर्व पुस्तकांच्या लेखक-कवी मंडळींना, प्रकाशकांना शतशः धन्यवाद. त्यांच्याशिवाय ही लेखमाला पूर्णत्वाला गेलीच नसती.

१० सप्टेंबर २०२१ रोजी या पुस्तकाच्या पहिल्या भागाचे ( लेख क्र १ ते १३) प्रकाशन श्री अरविंद दोडे यांचे हस्ते झाले. त्यास वाचकांचा उत्तम प्रतिसाद लाभत आहे. आज वाचकांच्या चरणी याच पुस्तकाचा दुसरा भाग ( लेख क्र. १३ ते २६) अर्पण करताना पुन्हा आनंद आणि समाधान वाटत आहे.  आपल्या अभिप्रायाच्या प्रतीक्षेत.

'आणि ग्रंथोपजीविये' या माझ्या पहिल्या ईबुक पुस्तकाचा गंध जगभरातील वाचक रसिकांपर्यंत, ग्रंथालयांपर्यंत दरवळू दे अशी प्रार्थना श्री सरस्वती देवीच्या चरणी करतो आणि तूर्तास थांबतो..

रामदास खरे, ठाणे.

## शुभेच्छा

या पुस्तकात साधारणतः साठोत्तरीतील अभिजात ग्रंथांपासून आताच्या काळातील दर्जेदार ग्रंथांचा सखोल परिचय करून देण्यात आला आहे. आस्वादक समीक्षेला परीक्षणाचा वेगळा आयाम देताना कवी, लेखक, चित्रकार रामदास खरे यांचा हा वेगळा पैलू ग्रंथमित्रांसमोर येत आहे. दुर्गा भागवतांच्या 'पैस' पासून सुरु झालेल्या या यात्रेत ग्रेस, श्री. ना. पेंडसे, गोनीदा, जयवंत दळवी, मतकरी, महानोर, पाडगावकर, मधु मंगेश कर्णिक, खानोलकरांना सामावून घेत पुढील पिढ्यांचे प्रतिनिधित्व करणारे अच्युत गोडबोले, मंगला आठलेकर, अशोक बागवे, डॉ. वसुधा सहस्त्रबुद्धे आदी नामवंतांचा सहभाग आहे. तर नव्या पिढीतील किरण येले, सतीश सोळांकूरकर, प्रतिभा सराफ, गीतेश शिंदे, सुजाता राऊत आदींच्या पुस्तकांची दखल घेताना रामदास खरे यांनी सारांशात त्या साहित्यिकांची वाटचालही अधोरेखित केली आहे. एकूण पन्नास लेखांची चार पुस्तके करण्याची कल्पना अभिनव आहे.

हा केवळ भाष्यग्रंथ नसून स्वतःची निरीक्षणे सुद्धा लेखकाने नोंदविलेली आहेत. हा एक सुंदर आणि संग्राह्य ग्रंथानुभव आहे. या 'ई-बुक' चे स्वागत वाचक- रसिक, ग्रंथप्रेमी करतीलच असा विश्वास आहे.

**अरविंद दोडे (कवी, समीक्षक, निरुपणकार)**

** अनुक्रमणिका **

१४. माझं येणं अटळ आहे.... डॉ. मंगला आठलेकर

१५. भावस्पर्शी आठवांचा आरसा ..... डॉ. अनंत देशमुख

१६. घरे... शब्दप्रभूंची... असंख्य आठवणींची..... संपादन : अशोक कोठावळे

१७. 'कवितांच्या गावा जावे' : एक विलक्षण प्रवास.... संपादन- डॉ महेश केळुस्कर

१८. अस्वस्थ काळाची स्वगतं.... अशोक बागवे

१९. साद सह्याद्रीची...भटकंती किल्ल्यांची..... प्र. के. घाणेकर

२०. स्मरणरंजनाचा गंध: पाने आणि पानगळ... वसंत वसंत लिमये

२१. मंटोच्या कथांचे समृद्ध अवकाश..... डॉ वसुधा सहस्रबुद्धे

२२. नादवेध : एक अविस्मरणीय अक्षर-मैफल....अच्युत गोडबोले व सुलभा पिशवीकर

२३. जुन्या ठाणे नगरीचा समृद्ध दस्तावेज....श्री. वा. नेर्लेकर

२४. लेण्यांच्या प्रदेशात.... डॉ दाऊद दळवी

२५. दमदार आवाजाची झुंजार कविता....विष्णू सूर्या वाघ

२६. अंतरीच्या सौंदर्याचा परिमळू ....झुळुकला अळुमाळू..... अरविंद दोडे

# १४. ** माझं येणं अटळ आहे **




" धर्माचा स्वीकार आणि त्याचा वापर कोणत्याही समाजात तीन पातळ्यांवर होताना दिसतो- अध्यात्मिक, राजकीय आणि सामाजिक. धर्म म्हणजे धारणा. मनःशांती, सतमूल्यांवर श्रद्धा, आसक्तीवर संयम, रागलोभावर संयम, सत-असतचं भान हे धर्म

शिकवतो. प्रत्येक धर्माची तत्वं ही माणसाच्या कल्याणासाठीच असतात. पण जेव्हा धर्माचा वापर सामाजिक आणि राजकीय हेतूनं केला जातो तेव्हा सगळा घोटाळा होतो. फसगतीला सुरवात होते. बुद्धाच्या तत्त्वज्ञानाचं मर्म खूप वेगळं आहे. मनःशांतीकडे नेणारं आहे. मनःशांतीच्या शोधात जाणाऱ्याला जात नसते. तिथं सगळे समान असतात. पण जातीच्या राजकारणासाठी जेव्हा धर्माचा वापर होतो तेव्हा मनःशांती तर दूरच पण सूड आणि कटुतेनं मनं मात्र व्यापून जातात. सत्तेच्या राजकारणासाठी जेव्हा धर्माचा वापर केला जातो तेव्हा रक्तपात होतो."

" बुद्धानं सांगितलेली चार आर्यसत्य आणि आठपदरी मार्ग, जो माणसाला दुःखमुक्त करू शकतो तो सर्वांना माहीत व्हायला हवा. त्याच्या आयुष्यातले चमत्कार माहीत हवेत.त्याचं संन्यासीपण कळायला हवं. अखेरच्या क्षणापर्यंत, श्वासापर्यंत जिज्ञासूला दीक्षा देऊ इच्छिणाऱ्या बुद्धाचं गुरुपण समजायला हवं. सुरवातीच्या काळात कठोर तपाचरण करणारा, नंतर त्यातील व्यर्थता जाणून मुक्तीपर्यंत नेणारा नवा मार्ग शोधणारा आणि आपल्या मृत्यूला जबाबदार धरला जाण्याची शक्यता असलेल्या चुंद कर्मारपुत्राला आपल्या परिनिर्वाणाचं श्रेय देऊन मोकळा होणारा बुद्ध सर्वांना माहीत व्हायलाच हवा.!"

इ.स. पूर्व ५६३ मध्ये भगवान गौतम बुद्धाचा नेपाळ मधील लुम्बिनी इथे जन्म झाला. बुद्धाला जाऊन आज तब्बल अडीज हजार वर्षांचा कालावधी लोटला आहे. असे असूनही विश्वाच्या वैचारिक इतिहासामध्ये गौतम बुद्धाचे स्थान हे अतिशय वरच्या स्तरावरचे आहे. अखिल विश्वातील मानव जातीच्या कल्याणासाठी बुद्धाने मांडलेले विचार, शिकवण ही आजच्या काळात देखील तितकीच महत्वाची कशी ठरते हे पाहणे, जाणून घेणे आज आवश्यक वाटत आहे. बुद्धाच्या जन्माच्यावेळी तिथे उपस्थित असलेल्या एका ज्योतिष पंडिताने भविष्यवाणी केली की हा बालक चक्रवर्ती होईल, मोठा राजा होईल, पण..पण त्याला जर धर्ममय जीवन कंठायचे असेल तर तो बुद्ध होईल. तो संसारत्याग करेल. ती भविष्यवाणी पूढे खरी ठरली. बुद्धाचे मूळचे नाव सिद्धार्थ होते. गौतम हे कुलनाम होते. राजकुमार सिद्धार्थला उत्तम शिक्षण देण्यात आले. यशोधरा या सुंदर राजकुमारीशी सिद्धार्थचा विवाह झाला. पुढे त्यांना राहुल नावाचा एक पुत्रही झाला. ऐश्वर्य, सुख, सुबत्ता यामध्ये तो रममाण झाला होता. राजा शुद्धोदन, राजपुत्र सिद्धार्थाला कुठल्याही प्रकारची कमतरता पडू नये म्हणून काळजी घेत होता. वयाच्या एकोणतीसाव्या वर्षापर्यंत सिद्धार्थचे सुखासीन आयुष्य जणू सरळ रेषेत चालले होते. राजा सिद्धार्थाला अध्यात्म, धार्मिक विचार आणि वैराग्य पासून कटाक्षाने दूर ठेवत होता. पण..

पण. जे घडायचे होते ते झालेच. एके दिवशी नगरात फेरफटका मारण्यासाठी सिद्धार्थ जात असताना वाटेत त्याने एक रोगिष्ट माणूस पाहिला, एक जख्खड म्हातारा पाहिला तर अजून पुढे गेल्यावर एक प्रेतयात्रा दिसली. सिद्धार्थ अस्वस्थ झाला. त्याला सारखे प्रश्न पडू लागले. आपले सुख हे क्षणभंगुर आहे तर साऱ्या विश्वात, चराचरात दुःख साठून राहिले आहे, त्याचे कशातही लक्ष लागेना, चिंतन,मनन करतानाच अचानक साक्षात्कार होऊन सिद्धार्थाने गृहत्याग केला.  संन्यास घेतला. गृहत्यागानंतर सिद्धार्थाने ज्ञानप्राप्तीसाठी चिंतन केले. अखेर बिहार राज्यातील गया इथे पिंपळाच्या वृक्षाखाली बौद्ध ध्यानस्थ बसले असता इ.स. पूर्व ५२८ मध्ये त्यांना दिव्य ज्ञानप्राप्ती झाली. सिद्धार्थ बुद्ध झाला.. बुद्ध म्हणजेच अवकाशाएवढा ज्ञानी माणूस. हे ज्ञान बुद्धाने स्वप्रयत्नाने आणि मोठ्या कष्टाने मिळवले. ऐहिक सुखाचा त्याग करणारा गौतम बुद्ध आभाळाहुन मोठा झाला. पुढे बुद्धाने उत्तर प्रदेश येथील सारनाथ येथे पाच पंडितांना पहिला उपदेश दिला. याच पहिल्या उपदेशास 'धम्मचक्रप्रवर्तन' असे म्हणतात. देशात ठिकठिकाणी प्रवचने करताना बुद्धांना अनेक शिष्य लाभले. त्यांना लाभलेल्या बुद्धांच्या विचारातून, शिकवणीतून बौद्ध धर्म खऱ्या अर्थाने वाढू लागला. त्यावेळी स्वतः बुद्धांनी एक लाख लोकांना बौद्ध धर्माची दीक्षा दिली.

आज घडीला जगभर बौद्ध धर्माचे अनुयायी आहेत. मात्र आशिया खंडात त्याचे प्रमाण लक्षणीय आहे. आशिया खंडाची पन्नास टक्के लोकसंख्या ही बौद्ध धर्मीय आहे. मुख्यत्वे श्रीलंका, जपान, चीन, ब्रह्मदेश, थायलंड या देशामध्ये बौद्ध धर्म चांगल्या रीतीने रुजला आहे, या देशांनी बांधलेली श्रीमंत अशी बौद्धमंदिरे आहेत. ती बौद्ध स्थळे प्रेक्षणीय केली आहेत. अनेक पर्यटकांचा पायरव या देशांमध्ये वाढत असतानाच, आपल्या हिंदुस्तानांत मात्र ज्या ठिकाणी प्रत्यक्ष बुद्धांनी प्रवचने दिली, जिथे ज्ञानप्राप्ती झाली ती स्थळे, ती गावे अद्याप बकाल का? उदा. बिहार. अराजकता आणि भ्रष्टाचार इथे फोफावलेला. हे भीषण सत्य नजरेआड करावे तरी कसे? बुद्धाचा पराभव आपणच केला ना ?

बुद्धाच्या एकूण जीवनप्रवासावर आजपर्यंत मराठी, हिंदी, गुजराती, इंग्रजी, पाली या भाषांमधून भरपूर प्रमाणात बुद्धचरित्रं लिहिली गेली आहेत. या पार्श्वभूमीवर प्रसिद्ध लेखिका, समीक्षक डॉ मंगला आठलेकर यांनी लिहिलेलं 'बुद्ध हसतो आहे' हे अप्रतिम पुस्तक २००९ च्या सुमारास माझ्या वाचनात आले. हे पुस्तक वाचल्यावर बुद्धाच्या विचारसरणीकडे मी वेगळ्या नजरेने पाहू लागलो. जगण्याचे एक वेगळे भान मला या पुस्तकाने दिले. मी थांबलो नाही. महाराष्ट्रातल्या काही बुद्धकालीन लेण्यांना मी भेटी दिल्या, फोटो काढले, स्केचेस काढली. एका वृत्तपत्रात या लेण्यांवर

मी लेखमाला देखील लिहिली. भटकंती करताना लेण्यांमध्ये गवसलेला दुर्मिळ एकांत, शांतता मी शब्दबद्ध करण्याचा प्रयत्न केला. लेणीकाव्य लिहिले. केवळ या एका पुस्तकामुळे मी वेगवेगळया माध्यमातून असा व्यक्त झालो. एका पुस्तकाने भरभरून दिले. हे अप्रतिम पुस्तक राजहंस प्रकाशनने ऑक्टोबर २००८ मध्ये प्रकाशित केले. लेखिका मंगला आठलेकर आपल्या मनोगतात म्हणतात " केवळ बुद्धचरित्र हा या लेखनामागचा हेतू नाही. बुद्धाला बोधीवृक्षाखाली जे ज्ञान प्राप्त झालं आणि पुढे त्याचा जो जगभर प्रसार झाला, त्या धर्मप्रसारात बुद्धाच्या अस्तित्वाची खूण खरंच कुठं उमटली का? की अहिंसा, करून, शांती, समता सारखी उदात्त तत्व त्याच्या धर्मग्रंथातच बंदिस्त राहिली? आणि तसं झालं असेल तर ते का झालं? हे शोधण्याच्या दृष्टीनं केलेला हा यथाशक्ती प्रयत्न !" लेखिका आठलेकर यांनी एम.ए., तसेच पीएच.डी केले असून मुंबईच्या विल्सन कॉलेजच्या त्या मराठीच्या विभागप्रमुख होत्या. २००४ मध्ये त्यांनी स्वेच्छानिवृत्ती घेतली. लेखिकेची आजपर्यंत विविध विषयांवर एकूण दहा पुस्तके प्रकाशित झाली आहेत.

युद्ध हवे की बुद्ध हवा अशा अस्वस्थ उंबरठ्यावर सारे जग उभे आहे. बुद्धाच्या विचारांचा आपण केलेला पराभव लेखिकेला अस्वस्थ करून जातो. या पुस्तकाच्या मलपृष्ठावर लेखिकेने जो

संदेश, जो विचार  वाचकाला नेमक्या शब्दात दिला आहे त्याने आपण हादरून जातो, अस्वस्थ होतो.

" सर्वनाश झाल्याशिवाय 'नवं' निर्माण होत नाही. गडद अंधार होतो तेव्हाच प्रकाशाच्या आगमनाची चाहूल लागते. हा निसर्गाचा नियम आहे ! आज सगळीकडे दिसतो आहे तो दुःखाचा, अशांततेचा, हिंसेचा उसळलेला प्रचंड आगडोंब... बुद्धाच्या तत्वज्ञानाचा आपण केलेला पराभव ! पण तरीही बुद्ध हसतो आहे.. आणि म्हणतो आहे, " पहा, माझ्या येण्याचा रस्ता तुम्ही मला मोकळा करून देत आहात. मी येणारच आहे. माझं येणं अटळ आहे आणि मी यावं अशी परिस्थिती तुम्ही निर्माण केली आहे..."

( बुद्ध हसतो आहे ( संशोधनात्मक, वैचारिक ),  डॉ मंगला आठलेकर, राजहंस प्रकाशन, पुणे )

# १५. ** भावस्पर्शी आठवांचा आरसा **




" लहानपणापासून मला एक स्वप्नं पडत आहे. स्वप्नात कोकणातले खाडी किनाऱ्यालगतचे घर दिसते. खाडीच्या पाण्यातून पुस्तकं येताहेत आणि मी ती गोळा करून घरात आणून

ठेवतो आहे असे दिसायचे. त्यात माझ्या मनात ग्रंथप्रेमाविषयी किंवा साहित्याविषयी रुची प्रकट झाली आहे, असे म्हणता येते. " किंवा " कळायला लागल्यापासून आपण सारेच 'अहम' चा तोरा वागवत असतो. शेवटी 'मी-तू' पणाची बोळवण केल्याशिवाय अध्यात्मिक प्रगती शक्य नाही हेच सत्य तेवढे उरते !"

ज्येष्ठ समीक्षक, संशोधक, डॉ अनंतराव देशमुख यांच्या 'आंबेया डहाळी' या ललितलेख संग्रहाचा शानदार प्रकाशन सोहळा दि. १० फेब्रुवारी २०२१ रोजी ठाण्यात मान्यवरांच्या हस्ते संपन्न झाला. व्यास क्रिएशन्स यांनी हे देखणे आणि मौलिक पुस्तक प्रकाशित केले आहे. समीक्षण, संशोधन क्षेत्रात देशमुख सरांनी डोंगराएवढं काम केले आहे. (वाचा : र धो कर्वे.... आठ खंड ) समीक्षक म्हंटले की त्या त्या साहित्याचं त्यांनी रुक्षपणे केलेलं समीक्षण, अनेक ग्रंथांचे संदर्भ,, दाखले, नोंदी, मार्मिक व परखड भाष्य, उलट सुलट मतांतरे, वगैरे असं काही मनामध्ये येऊ लागते आणि सामान्य वाचक बिचकून थोडा बाजूला जातो. मात्र रसास्वाद किंवा आस्वादक समीक्षा म्हणजे काय तर ती डॉ देशमुख सरांची समृद्ध साहित्य संपदा वाचल्यावर, अभ्यासल्यावर आपल्याला जाणवते. सर्वसामान्य वाचकाला समजेल-उमजेल अशा आस्वादक वळणाची मात्र अभ्यासपूर्ण समीक्षा आपल्याला वाचायला मिळते. 'आंबेया डहाळी' या ललित लेख संग्रहाबद्दल

देखील हेच सांगावे लागेल. कुठलेही पान उघडा आणि देशमुख सरांनी साकारलेल्या शब्दरूपी, अनुभवांच्या, आठवांच्या सरींमध्ये  चिंब भिजून जावे इतके सहजसुंदर आहे. "आंबेया डहाळी फळे चुंबी रसाळी .." अशी सुंदर ओळ आपल्याला ज्ञानेश्वर माउलींच्या एका रचनेत वाचायला मिळते. सदर पुस्तकात एकूण ४३ लेख आहेत आणि या लेखांचे अध्यात्मपर लेख आणि ललित लेख असे विभाजन केले आहे. दैनंदिन व्यवहारातून उमजलेलं साधंसुधं अध्यात्म, मुक्त चिंतन सरांनी प्रत्ययकारी शैलीत कागदावर साकारले आहे. उदा. ग्रंथसंग, देवालये, स्थितप्रज्ञ तो असतो कसा? ग्रंथवेडा, थँक्यू मिस्टर गॉड, राधा आणि कुब्जा, वगैरे तर ललित लेखात चेहरा, सल, मुलं परत गेल्यावर.घरभिंती. काऊचं घर चिऊचं घर. हे लेख विशेष आवडले, भावले. निसर्ग, त्याचे अविष्कार, परिसर, लहानपण, विविध टप्प्यावर भेटलेली माणसं, काही नव्याने गवसलेली तर काही कायमची सोडून गेलेली. ती हुरहूर, त्या आठवणी, ते भिडणारे प्रसंग, सरांनी विविध लेखांच्या माध्यमातून सशक्तपणे नेमक्या शब्दात साकारले आहेत.

मराठी साहित्यात ललित निबंधाची परंपरा मोठी आहे. कुसुमावती देशपांडे, इरावती कर्वे, दुर्गा भागवत, शांताबाई शेळके, महेश एलकुंचवार ते थेट आजच्या पिढीतल्या सौ रश्मी कशेळकर यांनी ललित लेखनाचा प्रवाह समृद्ध केला आहे. अल्पाक्षरी, मुक्त

शैलीतून लेख साकारले आहेत. अनेकवेळा ललित लेखन प्रकारात लेखक बहुतांशी आत्मकथनाच्या वाटेवर रुळतो आणि स्वतःचे अनुभव शब्दबद्ध करतो. देशमुख सर देखील त्यास अपवाद नाहीत. स्मरणरंजनात ते मनोमन रमतात. अनेक आठवणी, किस्से, आयुष्याच्या टप्प्यावर भेटलेली माणसं, अनुभव ते शब्दबद्ध करताना दिसतात. या संग्रहातील अनेक लेखांचा शेवट हुरहूर लावणारा, विस्मयकारक वळणावर येऊन ठेपणारा आणि पुढच्या लेखाची ओढ, उत्सुकता वाढवणारा आहे. देशमुख सरांनी उभ्या केलेल्या भावविश्वात वाचक रसिक मनापासून रमतो. वाचक-रसिक आपल्या गतकाळाच्या विश्वात अलगद पोहोचतो, गुंतत जातो हेच या पुस्तकाचे मोठं यश आहे.

ज्येष्ठ समीक्षक आणि देशमुख सरांचे परममित्र श्री. श्रीराम सिधये आणि सारंग दर्शने यांचे आग्रहाखातर सरांनी 'महाराष्ट्र टाइम्स' दैनिकासाठी 'सगुण-निर्गुण' हे सदर लिहिले. त्यावेळी सर अमेरिकेत आपल्या मुलांकडे होते. तेथून ते लेख श्री सिधये यांना पाठवायचे. मुंबई आकाशवाणीच्या ज्योत्स्ना केतकर यांचे सूचनेनुसार सरांनी निसर्गाची शब्दचित्रे रंगवली तर पुढे 'प्रहार' च्या रविवार आवृत्तीसाठी देशमुख सरांनी महेंद्र सुके यांचे आग्रहाखातर 'ललितगद्यात्मक' सदर लेखन रेखाटले. असे सर्व विखुरलेले लेख 'आंबेया डहाळी' या एकाच पुस्तकात आपल्याला वाचायला

मिळतात हे आपले भाग्य. देशमुख सर आपल्या मनोगतातून संवाद साधतात " माझं हे लेखन म्हणजे माझ्या व्यक्तित्वाचाच आविष्कार आहे. अध्यात्म हा काही माझा प्रांत नाही, तसा माझा पिंड नाही, प्रकृती नाही. पण कारणपरत्वे विद्यापीठात अध्यापन करताना संत साहित्याचं मी वाचन केलं ते लेखनात असं उतरलं." प्रकाशक निलेश गायकवाड म्हणतात " देशमुख सरांच्या अनुभवांचा, चिंतनाचा हा सुरेख कोलाज आहे. अनुभवातून स्फुरलेलं हे चिंतन आहे."

डॉ देशमुखसरांच्या चरित्रात्मक संशोधनकार्याचा प्रवास विलक्षण असा आहे. त्यांचा जन्म १ जुलै १९४८ रायगड जिल्ह्यातील रेवस जवळील 'बागदांडे' या गावातला. अतिशय प्रतिकूल परिस्थतीत त्यांनी आपलं शिक्षण जिद्दीनं पूर्ण केलं. मोठेपणी शिक्षक, प्राध्यापक. व्हायचं हे त्यांचं स्वप्न खरोखर पूर्ण झालं. १९७२ मध्ये एम ए पर्यंतचे शिक्षण पूर्ण करून सरांनी १९७८ मध्ये 'कुसुमावती देशपांडे यांच्या वाङ्मयाचा चिकित्सक अभ्यास' हा विषय निवडून त्यावर ( मुंबई विद्यापीठ येथून पी. एचडी संपादन केली. यावेळी सरांना प्रा.डॉ.व.दि.कुलकर्णी यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. मनाला काहीशी मुरड घालीत १९७४ ते १९८९ अशी पंधरा वर्षे दि सिंदिया वर्कशॉप लिमिटेड या खासगी कंपनीत सरांनी नोकरी केली. तेथे अर्थातच ते रमले नाहीत. त्यांचा

साहित्यिक पिंड त्यांना स्वस्थ बसू देईना. सरांचे स्वप्न अखेर पूर्ण झाले. १९८९ मध्ये ते मराठीचे प्राध्यापक म्हणून SNDT,(मुंबई) या महिला विद्यापीठात रुजू झाले. तिथे त्यांनी २००७ पर्यंत म्हणजेच १९ वर्षे नोकरी केली. या विद्यापीठाची स्थापना महर्षी धोंडो केशव कर्वे यांनी केली. कृतज्ञता म्हणून त्यांचे जीवन कार्य सर्वांसमोर आणावे असे ठरवले. मात्र स्वतः कर्वे यांनी आपले चरित्र तीनवेळा लिहिल्याने त्यात संशोधनाला जागा नसल्याने देशमुख सरांनी कर्वे यांचे चिरंजीव आणि कुटुंबनियोजनाचे आद्यप्रणेते डॉ र. धों. कर्वे यांचेवर संशोधनात्मक लिहावे असे मनोमन ठरवले. अथक संशोधनानंतर रधोंचे चरित्र तब्बल आठ खंडांमध्ये अखेर २०१० मध्ये पद्मगंधा प्रकाशनाने प्रकाशित केले. देशमुख सरांची खरी ओळख या रधोंच्या डोंगराएवढ्या कामामुळे होतेच.

डॉ देशमुख सरांची संशोधनात्मक,चरित्रात्मक आणि समीक्षात्मक अशी एकूण पंचवीसच्या वर पुस्तके प्रकाशित झाली आहेत. नुकतीच प्रकाशित झालेली काही पुस्तके : 'रंगांचा जादूगार : दीनानाथ दलाल, चित्रगुरु कृष्णराव केतकर, मराठी साहित्यातील अश्लीलतेचा पहिला वाद : संशोधन आणि संपादन, नाट्यविचार, नाट्यसमीक्षा, ओ अमेरिका (प्रवास वर्णन ). देशमुख सरांनी ललित लेखनाबरोबरच कथालेखन हाही प्रकार हाताळला आहे.

'अडनीड आणि इतर कथा' हा त्यांचा पहिला कथासंग्रह प्रकाशनाच्या वाटेवर आहे. अनेक महत्वाच्या पुरस्कारांनी डॉ देशमुख सरांना आजवर सन्मानित करण्यात आलं आहे.

हे लक्ष आठवांचं पुस्तक प्रत्येकाच्या संग्रही हवंच . डॉ. देशमुख सरांच्या पुढील लेखन प्रवासास आमच्या खूप खूप शुभेच्छा.

( आंबेया डहाळी ( ललितलेख संग्रह ), डॉ अनंत देशमुख, व्यास क्रिएशन्स, ठाणे )

# १६. घरे... शब्दप्रभूंची... असंख्य आठवणींची..




लेखक कुठे राहतो, कसा जगतो, त्याची जीवनशैली कशी आहे, ज्या घरात त्याला साहित्यकृती स्फुरली असेल ते घर कसे असेल? आजूबाजूचा परिसर कसा असेल याबाबत जाणून घेण्यास

वाचक-रसिक नेहमीच उत्सुक असतो. लेखक ज्या वास्तूत राहतो त्या वास्तूशी असलेले त्याचे नाते, जिव्हाळा, प्रेम हेही जाणून घेण्यास वाचकाला आवडते. याचाच विचार होऊन ललित सारख्या दर्जेदार मासिकाने १९८४ मध्ये एक आगळीवेगळी लेखमाला सुरु केली होती. त्यामध्ये त्या त्या लेखकाच्या घरासंबंधीच्या आठवणी, किस्से त्या त्या लेखकाचे जवळचे नातेवाईक, मित्र यांनी शब्दबद्ध केले होते. १९९७ मध्ये त्या लेखांचे सुंदर पुस्तक झाले. 'लेखकाचे घर' या नावाने मॅजेस्टिक प्रकाशनने ते पुस्तक प्रकाशित केले. पुस्तकाचे संपादन अर्थातच श्री अशोक कोठावळे यांनी नेटके केले. याच पुस्तकातील काही लेखक-कवी मंडळींच्या त्यांच्या घरासंबंधीच्या आठवणी संक्षिप्त स्वरूपात आपल्या वाचकांसाठी.

१. महाराष्ट्राचे आधुनिक वाल्मिकी, महाकवी ग. दि. माडगूळकर यांच्या घराविषयीच्या आठवणी जागवल्या आहेत कवी,गीतकार राजा मंगळवेढेकर यांनी.

" अण्णा तसे श्रद्धाळू, आस्तिक वृत्तीचे. अण्णांनी बंगला घेऊन टाकला. अण्णांनी तो बंगला पाहिल्यावर आणि त्याहीपेक्षा बंगल्यापुढची रस्त्यालगतची पाच वटवृक्षांची गळामिठी पाहिल्यावर खरेदी केलेल्या त्या वास्तूचे बारसं करून टाकलं. नाव

ठेवलं "पंचवटी" ! नियतीचा संकेत काय असेल तो असो, पण अण्णांच्या 'पंचवटी' मध्ये पुढं चारपाच वर्षातच 'गीतरामायण' अवतरलं. यामुळे आधुनिक वाल्मिकी या नावानं अण्णा मराठी जगतात ख्यातनाम झाले. लेखक-कवी म्हणून अण्णांनी यशाची चढती कमान पंचवटीनं डोळे भरून पाहिलेली आहे. लेखक म्हणून अण्णांना लाभेलला राष्ट्रपतींचा पुरस्कार आणि पद्मश्री हा 'किताब पंचवटीनं सोनेरी फ्रेमसह आपल्या छातीवर अभिमानानं मिरवला आहे. कितीतरी चित्रपटांच्या कथा व गीत लेखनाची पारितोषिकं पंचवटीनं आपल्या छताखाली सांभाळली आहेत."

२. प्रसिद्ध लेखक श्रीपाद काळे यांच्या कोकणातल्या घरासंबंधीची निरीक्षणं त्यांचे मित्र लेखक रवींद्र पिंगे किती सुंदरपणे केली आहेत पहा :

" काळयांची ही वास्तू शतायू तर असणारच. आगर घरंदाज आहे. नारळी, पोफळी, आंबे, अननस, काजू, फणस, करवंदी, जास्वंद, अबोली, रातराणी, गुलाब, चाफा, तुळस असा हरकामी ताफा आहे. स्वयंपाकाच्या खोलीतून कडधान्य उकडत ठेवल्याचा, न्हाणीघरातून सर्पणाच्या धुराचा, गोठ्यातून शिळया शेणामुताचा, चुलखंडाजवळ करपलेल्या काजूबियांचा, आगरात भिजक्या मातीचा नि परसवात सुक्या गोवऱ्यांचा, असे सगळे वास एकत्र

नांदायला आले आहेत. पडवीतल्या झोपाळ्याच्या कड्यांची लयबद्ध कुरकुर चालू आहे. वहिनींनी खास पाहुण्यांसाठी म्हणून जात्यावर कुळीथ दळायला घेतले आहेत. स्वयंपाकाच्या खोलीतल्या फुंकणीची फुंकही ऐकू येते. सुतार पक्ष्याची ठोकठोक फणसावर चालू आहे. गोठ्यात गोरवांचं संथ रवंथ चालू आहे आणि पडवीत भालाजवळ भुंगा आलेला आहे. फक्त बावीवर राहाटाचा तेवढा आवाज नाही, कारण तिथे आता पंप बसला आहे नि तूर्तास तो बंद आहे.!"

३. कविवर्य मंगेश पाडगावकर यांच्या सायन, मुंबई इथल्या घराविषयीच्या आठवणी कवी निरंजन उजगरे यांच्या शब्दात.

" तसं पाहिलं तर 'साई- प्रसाद, प्लॉट क्रमांक १२५/अ, हा सर्व तपशील बऱ्याच उशिरा मनात नोंदला गेला. सायनला जातानाचा तुडुंब उत्साह. त्यावेळी आमच्यासाठी ते चौथ्या मजल्यावरचे घर म्हणजे आमच्याशी छान गट्टी जमलेल्या अजित- अंजली- अभयचं, खूप मायेने वागणाऱ्या ताई- आत्याचं आणि आमच्याशी जास्त न बोलणाऱ्या आमच्या आजोबांचं म्हणजेच मंगेशमामांचं घर होतं. पाडगावकर आडनावाचे एक मोठे कवी इथे राहतात हा तपशीलही खूप नंतरचा.या घराची नानाविध रूपं पाहता पाहता, मी इंजिनियरिंगला असताना मंगेशमामांच्या बंद खोलीचा

दरवाजा माझ्यासाठी 'खुलं जा सिमसिम' म्हंटल्यावर उघडावा तसा हळूहळू अपार आपुलकीने उघडला गेला. खोलीमध्ये नीटपणे लावून ठेवलेल्या पुस्तकांशी माझं जवळचं नातं जडलं. आज सायनला जाताना सगळयात जास्त आकर्षण वाटतं, ते आतल्या खोलीत बसून नवीन कविता ऐकण्याचं आणि निवडक ऐकवण्याचं !"

४. सुप्रसिद्ध नाटककार, गूढकथाकार रत्नाकर मतकरी यांच्या घराविषयीच्या आठवणी लिहिल्या आहेत त्यांची कन्या, अभिनेत्री सुप्रिया विनोद यांनी.

" आईबाबांचं लग्न झालं त्या सुमाराला म्हणजे १९६५ मध्ये सगळं कुटुंब ग्रॅन्टरोडहून दादरला आलं. त्यानंतर लगेच आजोबा गेले. ही एक दुःखद घटना सोडली, तर तसं आजपर्यंत आमच्या घराने आम्हाला सुखच दाखवलं. लोककथा-७८, प्रेमकहाणी, आरण्यक यांसारख्या बाबांच्या गाजलेल्या प्रायोगिक नाटकांवर बक्षिसांची खैरात झाल्यानंतरचा जल्लोष आणि अचाट गावची अफाट मावशी, अलबत्या गलबत्या या बालनाट्यांची शंभरी, लोककथाचे तीनशे प्रयोग,अशा महोत्सवांचा आनंद आम्ही बेभान पार्ट्या करून साजरा केला, तो याच घराच्या गच्चीवर ! आमच्या घरातला छुपा रुस्तम आहे आमचा माळा ! इथे बाबांचा एक

कुणालाच माहित नसलेला पैलू पहायला मिळतो. १९६५ सालापर्यंत बाबांनी काढलेली सुमारे पाऊणशे एकाहून एक सुंदर चित्रे या माळ्यावर आहेत.! घरच्यांच्या विरोधामुळे बाबांना चित्रकला सोडणं भाग पडलं. आमचं घर आदर्श आहे, असं मुळीच नाही, पण आदर्शाचं भान त्याला आहे एवढं निश्चित."

५. थोर इतिहास संशोधक, लेखक डॉ. रा. चि.  ढेरे यांच्या पुण्यातल्या घराविषयीच्या आठवणी जागवल्या आहेत त्यांच्या कन्या सुप्रसिद्ध कवयित्री, लेखिका  डॉ अरुणा ढेरे यांनी.

" पानशेतचा पूर आला आणि नदीकाठचं ते शेणामेणाचं घर पार वाहून गेलं. कष्टानं जमवलेला प्रचंड पुस्तकसंग्रह गेला. पुन्हा मांडामांड. नवी जागा नदीकाठीच मिळाली. शनिवारातलं हे घर आमच्या पहिल्या दीडखणी खोलीपेक्षा पुष्कळच मोठं म्हंटलं पाहिजे. नव्या पुस्तकाचं स्वागत नव्या घरात पुन्हा सुरु झालं. बघताबघता घराच्या भिंतींना छतापर्यंत पुस्तकं लागली. पुस्तकांचा एक विशिष्ट वास आमच्या मधल्या घरात सतत रेंगाळत असायचा. तो प्रचंड संग्रह आणि अण्णांचं  लेखक-संशोधक असणं या दोन्ही गोष्टी आम्हा तीनही मुलांसाठी इतक्या सहज गृहीत होत्या की त्या गोष्टींचं इतरांना नवल का वाटतं हेही आम्हाला कळत नसे. लेखन संशोधनाव्यतिरिक्त अण्णांची आवडती गोष्ट म्हणजे गप्पा. गप्पा

आणि चहा या दोन घरातल्या अविभाज्य, अटळ गोष्टी. आमच्याकडे गोंधळी, महानुभाव संन्यासी यायचे, ज्येष्ठ साहित्यिक यायचे ( बोरकर, माडगूळकर, बेंद्रे, कुरुंदकर ), संस्थानिक, सामाजिक कार्यकर्ते आणि रस्त्यावरचे साधे स्नेहीही यायचे. पुढच्या काळात आम्ही शनिवारातलं ते घर सोडून आम्ही तुळशीबागवाले कॉलनीतल्या आमच्या आत्ताच्या घरात रहायला आलो. हे नवीन घर प्रशस्त आहे, पुर्वीसारखंच आल्या-गेल्याचं, गजबजतं घर आहे."

वाचकाला लेखकांच्या घराविषयीची असलेली उत्सुकता,कुतूहल, जिज्ञासा यातील अनेक लेखांमुळे मात्र पूर्ण होते.

( लेखकाचे घर, संपादन श्री अशोक कोठावळे, मॅजेस्टिक प्रकाशन, मुंबई )

# १७. 'कवितांच्या गावा जावे': एक विलक्षण प्रवास




*ते दिवस आता कुठे जेव्हा फुले बोलायची*

*दूर ती गेली तरीही सावली भेटायची*

*त्या तिच्या वाटेवरी ती झिंगती झाडे जुनी*

*हात देताना तिला माझीच फांदी व्हायची*

***पावसाळा पेच होता ह्या सरी वळवू कुठे***
***चिंबताना त्या पुलाखाली ती नदी थांबायची***
***वर निळी कौले नभाची डोंगराची भिंत ती***
***ते नदीकाठी भटकणे हीच शाळा व्हायची***
***फाटके होते खिसे अन नोटही नव्हती खरी***
***पण उगवत्या चांदण्यावर मालकी वाटायची***

उत्तररात्र. कुणालाच वेळेचं भान नाही. त्या कवींच्या समोरील रसिकांना देखील नाही. दोघेही धुंद, कवितेत शंभर टक्के बुडालेले. तो कवी ती कविता स्वतः लावलेल्या चालीमध्ये बेधुंदपणे गात होता. कविता संपली असे वाटत असतानाच कुठल्याशा कोपऱ्यातून कुण्या रसिकाची पुन्हा फर्माईश, पुन्हा सादरीकरण, पुन्हा कविता आणि फक्त कविताच. होय..बरोबर ओळखलंत मित्रांनो. त्या आशयघन कवितेचे तितकेच सुंदर चालीमध्ये सादरीकरण केले होते अरुण म्हात्रे या मनस्वी कवीने. नंतर...नंतर... या मनस्वी कवीला भेटत गेले काही अस्सल कवीकुळातले परममित्र. एक..दोन...तीन.. मग यथावकाश..सगळे मिळून सात.. एकेक किस्से, फर्माईशी, वेगळेपण, धुंदपण, गावागावात केलेली मनमुराद भटकंती, भेटलेले जिवलग, रसिक, त्याचे अलोट प्रेम,

जिव्हाळा....हळूहळू फुलत गेला कवितांचा  मळा. एक कार्यक्रम मिळाला..पण आणखीन एक..मग पन्नास..शंभर..आणि..पुढे तर... जाणून घेऊया त्या सात वेड्या कवी मित्रांची विलक्षण कहाणी. कवितांचा तो गाव आणि तो प्रवास.

एखादा प्रयोग किंवा एखादी गोष्ट ठरवून काही होत नाही, ती अगदी सहजपणे, आपोआप निर्माण होते आणि पुढे तर इतिहास घडतो. १९८६ सालातली ती रात्र.  ठिकाण ठाण्याजवळचे कळवा गाव. कवितेची मैफील उत्तरोत्तर रंगू लागते. या घरगुती मैफिलीची संकल्पना अर्थातच अरुण म्हात्रे यांची. त्यावेळी तिथे उपस्थित असलेले आणखीन कवी मित्र म्हणजे अशोक नायगावकर, अशोक बागवे व इतर.  इंदूरहून आलेले एक रसिक श्री. वसंत पोतदार यांना या तरुण कवी मंडळींनी सादर केलेल्या कवितांचे सादरीकरण प्रचंड आवडल्याने त्यांनी चक्क या साऱ्यांना इंदूरला येण्याचे आवताण दिले. ती पोतदारांची उत्स्फूर्त दाद 'कवितांच्या गावा जावे' या  गाजणाऱ्या कवितांच्या कार्यक्रमाची नांदी ठरली. इंदूरचा कार्यक्रम अर्थात प्रचंड गाजला. वृत्तपत्रात बातम्या झळकल्या. अशोक नायगावकर, अशोक बागवे, किशोर कदम (सौमित्र ) आणि स्वतः अरुण म्हात्रे एकदम प्रकाशझोतात आले.

कवीमित्र अरुण म्हात्रे यांच्याशी गप्पा मारताना ‘कवितांच्या गावा जावे’ या प्रवासात ते हरवून जातात. एकेक आठवणी, किस्से ते सांगू लागतात. " खरंतर परफॉर्मिंग हे काही आमचं क्षेत्र नव्हे. कवितेमुळे आम्ही मंचावर, माईकसमोर असतो, इतकंच . पण बघता बघता वाढत गेलेल्या झाडासारखं 'कवितांच्या गावा' चं अस्तित्व आमच्यात रुजलं आहे. या कार्यक्रमाचे कैक प्रयोग झाले. त्यातून पसरत पसरत, अशा तऱ्हेच्या कार्यक्रमातून कविता लोकांपर्यंत पोचवण्याचे श्रेय आमच्या खात्यावर चढलं."

जुन्या काव्यप्रेमी मंडळींना नक्कीच स्मरत असेल एकेकाळी कविवर्य मंगेश पाडगावकर, वसंत बापट आणि विंदा करंदीकर या ज्येष्ठ मंडळींनी कवितेला खऱ्या अर्थाने पुस्तकातून बाहेर काढलं. त्या बंदिस्त कवितांचे मंचावर उत्कृष्टपणे सादरीकरण केले. कविता गावोगावी पोचवल्या आणि रुजवल्या देखील. अगदी तोच प्रयोग १९८६ च्या दरम्यान  पुढील पिढीने म्हणजेच अरुण म्हात्रे आणि त्यांच्या परममित्रांनी तितक्याच ताकदीने मंचावर सादर केला. कवितांच्या गावा जावे या अभिनव प्रयोगाचे एक नाही, शंभर नाही तर तब्बल हजाराच्यावर प्रयोग झाले. काव्यरसिकांचे अलोट प्रेम या कविमंडळींना आणि त्यांच्या कवितांना लाभले. या

काव्यप्रवासात वेगवेगळया टप्प्यांवर कोकणातले प्रसिद्ध कवी महेश केळुस्कर, ठाण्याचे निरंजन उजगरे आणि निसर्ग कवी नलेश पाटील सहभागी झाले आणि कार्यक्रमाला एक वेगळाच बाज आणि उंची देखील लाभली. महाराष्ट्रात, इतर राज्यात, इतकेच काय बाहेरच्या देशात देखील 'कवितांच्या गावा जावे' ची पताका डौलाने फडकू लागली. मराठी कवितेची आणि सादरीकरणाची परंपरा खरोखर गंभीरपणे पुढे नेणाऱ्या त्या सात कवी वीरांचा काव्य प्रवास थक्क करणारा होता. अनेक आठवणी, विविध किस्से, त्या त्या कवींच्या वेगवेगळया प्रकृतीच्या कविता आणि त्या सादर करण्याची वेगवेगळी शैली. पुन्हा त्यांचे चित्रविचित्र मुडी स्वभाव, मनस्वीपणा, दिलदारपणा तर कुठे अति चिकित्सकपणा. सारंच विलक्षण. डॉ महेश केळुस्कर या सहा कवींच्या सोबत कार्यक्रम करीत असताना हे सारं संचित एखाद्या टिपकागदासारखे टिपत होते.

पुढे तर या अफाट आणि अचाट कार्यक्रमांचे, त्यात सादर केलेल्या कवितांचे, किस्स्यांचे, आठवणींचे, कवींच्या स्वभावांचे कुठेतरी डॉक्युमेंटेशन करावे या उद्देशाने वसईची डिंपल पब्लिकेशन ही प्रकाशन संस्था पुढे सरसावली. या साऱ्या कवींची मोट

बांधण्याचे म्हणजेच संपादनाचे अवघड काम डॉ महेश केळुस्कर यांचेवर सोपवले. . त्यांनी ते अतिशय रसिकतेने निभावले देखील. यामध्ये प्रत्येक कवींच्या निवडक पंधरा कविता, कवीचा संक्षिप्त परिचय देण्यात आला. ३१ जुलै २००१ रोजी 'कवितांच्या गावा जावे' याच शीर्षकाचे सुंदर पुस्तक डिंपल पब्लिकेशन्स यांनी प्रकाशित केले. पुस्तकाच्या मुखपृष्ठाची वेगळी संकल्पना कवी नलेश पाटील यांची. याही पुस्तकाला वाचक रसिकांचा उदंड प्रतिसाद मिळाला आणि २००४ मध्ये त्याची व्दितीय आवृत्ती प्रसिद्ध झाली. डॉ महेश केळुस्कर यांनी एकूण या काव्यप्रवासाचे यथार्थ दर्शन पुस्तकाच्या आरंभी आपल्या मार्मिक शैलीत केले आहे आणि ते मुळातून वाचण्यासारखे आहे. या सातही कवींचा परिचय त्यांनी खुमासदार आणि तिरकस शैलीत केला आहे. सातही कवींची संक्षिप्त झलक त्यांच्याच शब्दात.

अरुण म्हात्रे : टोटल कवी असण्याचा शाप त्याला मिळालाय, त्यातुन त्याला मुक्ती नाही. अरुणला जर शंभर लोकं भेटलेले असले तर शंभर लोकांची त्याच्याबद्दल शंभर मतं असणार. नाटक, सिनेमा, संगीत, जाहिरातबाजी, कॉलम रायटिंग, राजकारण, चळवळी, कवीसंमेलन, सगळं एकाचवेळी चाललेलं असतं त्याचं.

त्याला गर्दी मनापासून आवडते. कवितेपोटी त्याने अख्खा महाराष्ट्र पालथा घातलाय.

किशोर कदम (सौमित्र ) : मनस्वी माणूस. पं. सत्यदेव दुबेंकडे तो नाटक शिकला. अमोल पालेकर, मीरा नायर, शांता गोखले, श्याम बेनेगल अशा ग्रेट लोकांशी त्याची दोस्ती आहे. व्हिन्सेंट व्हान गॉगपासून मिलन कुंदेरापर्यंत त्याचं अफाट वाचन आहे. त्याच्यात इतकी रग आहे की एक दिवस तो ऑस्कर-बिस्कर खिशात घालील की काय अशी भीती आम्हाला वाटत राहते.

निरंजन उजगरे : तो कुणाबद्दलच कधी वाईट बोलत नाही. तो कविकुळाला मानणारा आहे. कवी असूनही शिस्तीत राहणारा. कुठल्याही क्षणी तो तसा तो सावध असतो. आपल्या कवितांचं व्यवस्थापन करण्यात निरंजनच सर्वाधिक कुशल आहे.

नलेश पाटील : निसर्ग हा त्याच्या कवितेचा आधार. त्याची तीव्र रंगसंवेदना. तो जातिवंत चित्रकार असल्याने रंगांच्या हजारो छटा त्याच्या कवितेत येतात. नलेशमध्ये एक उपजत लय आहे.

मोठ्या जाहिरात कंपनीतला हा माणूस गावच्या चावडीवर बसलेला असल्यासारखा वाटतो.

अशोक बागवे : मराठी कवितेची सगळी परंपरा त्याला नीट ठाऊक आहे. शेकडो जुन्या कविता त्याच्या जिभेवर आहेत. निसर्ग आणि प्रीती हे या कवीचे स्थायीभाव आहेत. त्याने आयुष्याचे बरेच अवतार बघितलेत. त्यामुळेच लखलखत्या सुरीवर जुईचं फूल ठेवून तो कायम चालत असतो.

अशोक नायगावकर : या नावाच्या इसमानं या तारखेपर्यंत त्याच्या अव्वल कवितांच्या पत्रावळयांना स्टॅप्लर नाही मारलेला ! या फकीर कवीचं अंतरंग काय आहे हे कळायला तशी वर्षानुवर्ष जावी लागतील. नायगावकरांचं काव्यवाचन हे खरोखरच एक अजब रसायन आहे. तो कुणाची कधी फिरकी घेईल याचा नेम नसतो.

आणि आता महेश केळुस्कर : एकीकडे मालवणी भाषेवर जबरदस्त प्रभुत्व असतानाच सामाजिक मूल्यांचे प्रखर भान असलेला एक महत्वाचा कवी. कोमसाप उभारणीमध्ये यांचा

सिंहाचा वाटा. त्यांच्या झिनझिनाट कवितेने अवघ्या महाराष्ट्राला डोलावले, वेड लावले.

या सातही कवींनी सादर केलेल्या कविता मी अनेकवेळा पोटभर ऐकल्या आहेत. प्रत्येकाची शैली आगळीवेगळी. दुर्देवाने या सात कवींमधले निरंजन उजगरे आणि नलेश पाटील हे आज आपल्यामध्ये नाहीत. त्यांची आठवण येणे अपरिहार्य. आज नव्याने कविता लिहिणाऱ्या आणि ती मंचीय स्वरूपात सादर करणाऱ्या कवी मंडळींनी हे महत्वाचे पुस्तक एकदा तरी वाचावे, आपल्या संग्रही ठेवावे असे आहे. पुस्तकाच्या अगदी शेवटी कवी अरुण म्हात्रे यांनी लिहिलेली प्रस्तावना देखील वाचण्यासारखी आहे.

( कवितांच्या गावा जावे, संपादन- डॉ महेश केळुस्कर, डिंपल प्रकाशन, वसई )

# १८. ** अस्वस्थ काळाची स्वगतं **

*आकाश ठणकतंय*
*धरती सुन्न*
*भरवसा उडून गेलाय*
*एकमेकांवरचा*
*आणि पोरकेपणा*
*दत्तक घेतलेल्या अपत्यासारखा*
*वारसहीन !*




गेली सव्वा वर्षे आपण भयाच्या निर्वात पोकळीत अक्षरशः गरागरा फिरत आहोत. उद्या उजाडेल याची कोणतीच शास्वती नाही. भूतकाळातले विचित्र संदर्भ, वर्तमानकाळाने उघडलेला जबडा आणि भविष्यकाळाची अनामिक वाणी मनुष्यप्राण्याला कणाकणाने पोखरत आहे. त्याचा आकस्मिक हल्ला होऊ नये

म्हणून  मुटकुळं करून घराच्या अंधाऱ्या कोपऱ्यात गुपचूप पडून आहोत. जगाच्या कानाकोपऱ्यात हीच परिस्थिती. हे झाले शरीराचे.  आणि मनाचे? ते तर पार गोठून गेलंय नाहीतर 'तो' येईल. आत्तापर्यन्त मनाला बजावून ठेवलं होतं कदापि व्यक्त व्हायचं नाही पण... पण..वाफ दाबून ठेवली की त्याचा स्फोट आज किंवा उद्या होणारच. होय. बरोबर ओळखलंत. ती प्राणपणाने साठवलेली तप्त वाफ आज शब्दरूपाने अखेर बाहेर पडलीच. यथावकाश त्या वाफ्याच्या वलयांच्या झाल्या कविता. 'मनाचा नि:शब्द कोलाहल' अखेर बाहेर पडलाय. तात्पुरते का होईना तो कवी आता शांत झाला असेल.

कवी, गीतकार, व्याख्याते, निरुपणकार, उत्तम संवादक अशा विविध भूमिकेतून कविवर्य अशोक बागवे यांना आपण अनेकवेळा साहित्य विषयक उपक्रमाच्या मंचावरून अनुभवले आहे. समोर बसलेल्या श्रोत्यांची, रसिकांची अचूक नस गवसलेल्या या भावमधुर गीतकाराची अनेक गाणी देखील स्मरत असतील. उदा. वासाचा पयला पाऊस अयला, दे ना रे पुन्हा पुन्हा गर्दनिळा गगनझुला, नदीच्या किनारी नदीला म्हणावे. ई. आपल्याच मस्तीत भावविभोर शब्दांशी लीलया खेळणाऱ्या या कवीच्या मनाच्या

गाभाऱ्यात साठलेला काळाकुट्ट कोलाहल जेव्हा ज्वालामुखीसारखा फेसाळत बाहेर येतो तेव्हा वाचक रसिक क्षणभर गोठून जातो. अगदी तीच अवस्था आमच्या सर्वांचीच झालेली.

***खोल खोल भुयारात मी ढकलला जातोय***
***विवराच्या तोंडाचा भगभगीत प्रकाश***
***हळूहळू अंधारात विलीन होणारा...***
***विलय हाच मध्यबिंदू ठरावा माझ्या परिघाचा***
***मी भोगतोय चैतन्यहीन वैभव***
***जिवंत राहण्याचं...!***

कवी असं बोलून जातो तेव्हा अंधारून आल्यासारखं वाटतं. हे खिन्नतेचे, उदासीनतेचे ढग आपला हळूहळू ताबा घेऊ पाहत आहेत हेही जाणवतं. मनातली विलक्षण घुसमट ही अशी वाफेसारखी बाहेर पडणारी. त्याला अडवणार कोण? खुद्द कविराजांनी कबुली दिली आहे " हे सगळं परावलंबित्व मनाला अतिशय कष्टदायक होतं. म्हणून या कविता लिहून मी माझा आतला आकांत शब्दांमध्ये बांधण्याचा प्रयत्न केला." या पार्श्वभूमीवर मला आणीबाणीचे अशांत दिवस स्मरतात. 'पाचूच्या

हिरव्या माहेरी ऊन हळदीचे आले' असं तरल, प्रसन्न गाणे लिहिणारे पाडगावकर त्या आणीबाणीच्या वावटळीमुळे त्यांचेही मन विषण्ण, सैरभैर झाले. आणि क्षणातच त्या भावकवितेचा हात झिडकारून ' लाथेच्या भयाने डावा हात गांडीवर ठेवून उजव्या हाताने सलाम..सलाम भाई..सबको सलाम' अशा गोळीबंद कवितेशी केलेली जवळीक वाचकांना शॉक देणारी ठरली. थोड्याफरकाने इथेही तसेच.. बागवेसरांनी या विचित्र बंदिवासात मनातलं साठलेलं काहीसं जळजळीत म्हणता येणार नाही, पण .काहीसं उदासपण, प्रखर शाश्वत, घुसमटलेपण कवितांच्या रूपाने बाहेर काढलं. 'मौनाचा निःशब्द कोलाहल' या नव्या कोऱ्या कविता संग्रहाच्या शीर्षकापासून आपण सारे वाचक त्या कवितांमध्ये भोवंडून जातो.

असे असूनही ही कविता करोना जंतूंची अजिबात नाही. तर ही कविता मानवी मनात चेतवलेल्या भयकथेची, अकस्मात थांबणाऱ्या श्वासाची आणि अज्ञात, अटळ प्रवासाची आहे. कविता संग्रहात सामावलेल्या पंच्याहत्तर कविता प्रत्येकवेळी वेगवेगळी अनुभूती देतात. प्रत्येक कविता किमान दोन वेळा वाचल्यावर त्याची दुसरी बाजूही अलगद आपल्याला गवसते. यापूर्वी बागवेसरांच्या 'काळोखाची अवेळ' व 'अस्वस्थ अनावर' (२०१७) या दोन संग्रहामधून आजूबाजूच्या अस्वस्थ कोलाहलाचे प्रतिबिंब

वाचकाला झाले होतेच. त्यातील कविता देखील मुक्तछंदात बांधल्या होत्या आणि याही संग्रहातील कविता मुक्तछंदातून आपल्याशी थेट संवाद साधतात. केवळ अक्षरांसाठी साठवलेला श्वास वाचकाला समर्थपणे देऊ करतात. हे सारंच विलक्षण.

'सृजन संवाद प्रकाशन ' चे हे पहिलेच अपत्य. पण शंभरचा टप्पा पार केलाय अशा थाटात हा संग्रह सुंदरपणे साकारला आहे. पहिलेपणाच्या खुणा नाहीतच. मुखपृष्ठ, कागदाचा पोत, मांडणी उत्कृष्ट. आणि आतील मजकूर? सर्वोत्कृष्ट. 'सगळ्या कविता रांगत रांगत संग्रहाच्या आसपास कण्हत काहीतरी म्हणत' असं काहीसं मनाशी पुटपुटण्यापूर्वी मी थांबतो.

( मौनाचा निःशब्द कोलाहल (कविता संग्रह), अशोक बागवे, सृजन-संवाद प्रकाशन, ठाणे )

## १९. ** साद सह्याद्रीची...भटकंती किल्ल्यांची **




" महाराष्ट्राच्या भूगोलाला इतिहास मिळवून देणारा क्षण जिथे अवतरला तो हा रायगड. दिल्लीश्वरो वा जगदीश्वरो अशा प्रबळ मानल्या गेलेल्या दिल्लींद्राच्या सिंहासनाला हादरे देणारा वीराग्रणी शिवराय जिथे नांदला तो हा रायगड. महाराष्ट्र वसुंधरेचा पहिला

छत्रपती जिथे सिंहसनाधिष्ठित झाला, ते सुदर्शन मंगळ म्हणजे 'राजधानी रायगड ! '.

" तोरणा जिंकल्यावर धनलक्ष्मी प्रसन्न झाली. पुढे स्वातंत्र्यलक्ष्मी प्रसन्न करण्यासाठी त्यातली पै आणि पै खर्चून राजांनी मुरुंबदेवाच्या डोंगरमाथा तटबंदीचं पागोटं चढवलं ! तिन्ही माच्यांनी बालेकिल्ल्याभोवती फेर धरला. गडमाथ्यावरचा ब्रह्मर्षी आणि माचीवरच्या पद्मावती यांच्या राऊळांनी सुबकपणे अंग धरलं. आभाळाशी गप्पा मारणारा अभेद्य बालेकिल्ला अन देखणी संजीवनी माची यांनी डोंगर उत्तम सजला. 'हे राज्य व्हावं ही श्रींची इच्छा ! ' असं मानणाऱ्या ह्या राजानं इ.स. १६४८ ते १६७२ हा काळ राजगड ह्या बुलंद, बेलाग नि बळकट दुर्गावर काढला. शिवप्रभूंच्या जीवनातील अनेक हर्ष-विषादांच्या स्मृती या गडाशी संलग्न आहेत."

" १९ फेब्रुवारी १६३० रोजी शिवनेरी किल्ल्यावर महाराष्ट्राचा स्वातंत्र्यवीर उगवला. श्रीक्षेत्र भीमाशंकराच्या जटात अन नाणेघाटाच्या ओठात हा जडावाचा किल्ला आहे. भीमाशंकर, लेण्याद्रीचा गणपती, निमगिरीचा खंडोबा, ओझरचा गणेश, ओतूरचे चैतन्यस्वामी अन शिवाजीच्या पहाऱ्यात हे इवलंसं बाळ दिसामासी मोठं होऊ लागलं. त्याचे दूरदर्शी वडील अन

संस्कारप्रिय आई यांच्या जोडीला दादोजी कोंडदेवांसारखा प्रेमळ शिक्षक त्याला लाभला. शिवनेरी !... नाणेघाटाचा संरक्षक दुर्ग ! "

"दुर्गपती शिवरायांच्या स्वराज्याचा विस्तार सह्याद्रीच्या डोंगररांगा ओलांडून सिंधुसागराच्या लाटापर्यंत जाऊन पोहोचला. महाराष्ट्राच्या त्या भाग्यविधात्याच्या ध्यानी एक गोष्ट आली : ' जसे, ज्यास अश्वबल त्याची पृथ्वी, जसे ज्याजवळ आरमार त्याचा समुद्र.' आरमार उभारावयाचे तर जलदुर्गाचे पाठबळ हवे, मालवणजवळचे कुरटे बेट शिवरायांच्या मनी भरले. "चौऱ्याऐंशी बंदरी ऐसी जागा नाही" जे ध्यानी घेऊन जानभट अभ्यंकरांनी काढून दिलेल्या शुभमुहूर्तावर १० नोव्हेंबर १६६४ रोजी मालवणच्या किनाऱ्यावर श्रीविघ्नहर्त्या गणेशाची पूजन केले आणि सागरास सोन्याचा नारळ अर्पण केला. जंजिऱ्याचा सिद्दी, मुंबईचा इंग्लिश, फिरंगाणातील पोर्तुगीज यांच्या उरावर ही शिवलंका साकार होऊ लागली. शिवरायांनी नाव दिले 'सिंधुदुर्ग' !"

किल्ले आणि छत्रपती शिवाजी महाराज यांचे अतूट असे नाते आहे. दोघांनाही वेगळे करता येणारच नाही. महाराष्ट्रात एकूण ३६० छोटे- मोठे किल्ले आहेत. महाराष्ट्र हा दुर्गांचा देश आहे. स्थलदुर्ग, गिरीदुर्ग आणि जलदुर्ग हे दुर्गांचे प्रकार आहेत. किल्ल्याची डोळस भटकंती करताना तटबंदी, बुरुज, माची, टांकी,

बालेकिल्ला, पेठा, धान्यकोठार, अंधारकोठड्या, पागा, कारखाने हे सारे वैभव नजरेने प्यावे. उत्तर हिंदुस्तानातले किल्ले त्या मानाने सुरक्षित राहिले तर दक्षिणेतले विशेषतः महाराष्ट्रातले किल्ले ढासळल्याचे दिसते. याचे कारण किल्ले वाचवण्यासाठी उत्तर भारतीयांनी प्रचंड मोल दिले, मात्र दक्षिणेत कडवा प्रतिकार झाला. वाकाटक, कलचुरी, राष्ट्रकूट, सेंद्रक, शिलाहार, यादव व मराठे यांच्या राजवटींमध्ये अनेक किल्ले साकारले गेले. मात्र या किल्ल्यांचे महत्व शिवरायांनी अचूक ओळखले. पूर्वेस पसरलेल्या कणखर आणि राकट अशा सह्याद्री पर्वताची तटबंदी करून, त्याच्या अंगाखांद्यांवर गडकोटांचे राज्य उभारून शिवरायांनी एकाचवेळी मोघल, आदिलशहा, सिद्दी आणि इंग्रज अशा परकीय शत्रूंची आक्रमणं थोपवून, त्यांचा पराभव करून याच सह्याद्री मंडळात हिंदवी स्वराज्याची गुढी उभारली. स्वातंत्र्यलढ्याच्या या पवित्र कार्यात ज्याप्रमाणे अनेक निष्ठावंत शिलेदारांनी शिवरायांना मोलाची साथ दिली, अगदी त्याचप्रमाणे अनेक लढायांमध्ये या कणखर किल्ल्यांनी मोलाची भूमिका बजावली. शिवप्रभूंच्या पदस्पर्शांनी पावन झालेले हे किल्ले म्हणजे महाराष्ट्राची धारातीर्थे आहेत. एखाद्या प्रसिद्ध हिलस्टेन्शनवर जाणे वेगळे आणि जिथे इतिहास घडला अशा किल्ल्यावर जाणे वेगळे. त्या गौरवशाली इतिहासाचा मागोवा घेत, तेथील स्थळांचा परिचय करून घेत

शांतपणे किल्ला निरखणे, त्या किल्ल्याचे मनोगत ऐकणे हा एक वेगळाच अनुभव आहे. काळजात शिवभक्ती, पायांमध्ये किल्ले मनमुराद भटकण्याची शक्ती आणि मनाची उभारी असेल तर काहीच अशक्य नाही. अशा दुर्गप्रेमी भटक्या मंडळींसाठी प्रख्यात लेखक, शिक्षक, व्याख्याते, दुर्गप्रेमी, निसर्गप्रेमी, गिर्यारोहक आदरणीय श्री प्र. के. घाणेकर यांनी 'साद सह्याद्रीची ! भटकंती किल्ल्यांची !!' हे अप्रतिम पुस्तक लिहिले आहे. पुण्याच्या स्नेहल प्रकाशन यांनी ते प्रकाशित केले आहे. शिवप्रेमी, दुर्गप्रेमींचा उत्स्फूर्त असा प्रतिसाद लाभल्यावर या पुस्तकाच्या अनेक आवृत्त्या प्रकाशित झाल्या आहेत. २०१४ मध्ये त्यांची आठवी आवृत्ती प्रकाशित झाली.

किल्ल्यावर जावे कधी आणि कसे? कुठे रहावे, काय बघावे, मार्ग कोणते? यासारखी माहिती असलेली किल्ल्यांची अनेक पुस्तके सध्या उपलब्ध आहेत. या पार्श्वभूमीवर त्या त्या काळात त्या किल्ल्यावर नेमके काय घडले असावे? त्या किल्ल्याचे प्राचीनत्व, शिवकाळात त्या किल्ल्याने बजावलेली कामगिरी, किल्ल्याची सद्यस्थिती याचे ललित अंगाने लेखकाने केलेले रसाळ, उद्बोधक वर्णन वाचकाला खिळवून ठेवते. त्यामुळे या पुस्तकाला वाङ्मयीन मूल्य लाभले आहे. हे प्रवास वर्णन तर नाहीच पण दुर्गसंस्कृतीचे महत्व अधोरेखित करणारे एक महत्वाचे पुस्तक

आहे. या पुस्तकात एकूण शंभर किल्ल्यांची सुंदर माहिती साकारली आहे. लेखक प्र के घाणेकर यांनी व्यक्त केलेल्या मनोगतातून त्यांचे किल्ल्यांविषयीचे प्रेम, भ्रमंतीची आवड दिसून येते. मनोगतात ते म्हणतात " मला हिंडायला आवडतं. उन्हाळयात-पावसाळयात, थंडी-वाऱ्यात, सांज-सकाळी असं केव्हाही मी भटकलो, पण सह्याद्रीची साद अजूनही भुरळ घालतेच आहे. गिरिस्थाने, अरण्ये, धबधबे, लेणी, किल्ले, गुहा, गरम पाण्याची कुंडे, तीर्थस्थाने, सागरकिनारे, अभयारण्ये, सृष्टीविशेष असं बरंच काही निरखण्याजोगं, उत्तुंग कड्यांवरून निरखलेलं इंद्रवज्र, तेजोभास्कर, सिंधुसागराच्या तटावरून न्याहाळलेले ओले सूर्यास्त, हे सारं माझ्या मनाच्या पेटीत जपलेलं, खास माझं, पण तुम्हालाही ते अनुभवता येईल, पण मग पायात जोर अन मनाची उभारी हवी."

वयाच्या एकाहत्तराव्या वर्षीही या लेखकाचे दुर्गप्रेम जराही कमी झालेले नाही. लेखकाचा जन्म आवास, अलिबाग इथला. परंतु गेली अनेक वर्षे पुणे येथे वास्तव्य. वनस्पतीशास्त्र हा विषय घेऊन श्री घाणेकर यांनी एम.एससी पूर्ण केले. लहानपणापासूनच दुर्गभ्रमंतीची आवड. श्री घाणेकरांची एकूण पंचावन्न पुस्तके प्रकाशित असून बहुतांशी लेखन हे भटकंतीवर आधारित आहे. भटकंती, गिर्यारोहण, निसर्ग शिक्षण, ग्रंथलेखन अशा कार्यासाठी

श्री घाणेकरांना अनेक मानाचे पुरस्कार प्रदान करण्यात आले आहेत. ही भटकंती फक्त महाराष्ट्रापुरतीच मर्यादित नसून हिमालयातील शिखरांवर देखील त्यांनी भ्रमंती केली आहे. १९७४ मध्ये मनाली इथे गिर्यारोहणाचा प्राथमिक अभ्यासक्रम त्यांनी पूर्ण केला तर १९७८ मध्ये एव्हरेस्ट विजयाच्या रौप्यमहोत्सवानिमित्त एव्हरेस्ट परिसरात तब्बल अठरा हजार फूट उंचीच्या एका अनामिक शिखर मोहिमेचे त्यांनी नेतृत्व केले आणि तेथे पार पडलेल्या निसर्ग अभ्यास सहलीचे ते विजेते ठरले. १९८७ मध्ये महाराष्ट्र शासनाच्या मोडी लिपी प्रमाणपत्र अभ्यासक्रम ते प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झाले. आत्तापर्यंत महाराष्ट्रातील एकूण ३६० किल्ल्यांपैकी ३०० किल्ले त्यांनी पायी हिंडून पाहिले आहेत. भटकंती, पर्यटन या विषयावर त्यांचे हजाराहून लेख प्रकाशित झाले आहेत. तर दुर्गभ्रमंती विषयावर त्यांनी खेडोपाडी जाऊन पाचशेहून अधिक व्याख्याने दिली आहेत. आकाशवाणी तसेच दूरदर्शनवर अनेक कार्यक्रमात त्यांचा सहभाग.

साधारणतः पाचएक वर्षांपूर्वी श्री घाणेकर हे ठाण्यात व्याख्यानासाठी आले होते. विषय अर्थात दुर्गभ्रमंती हा होता. त्यावेळी त्यांचेशी छानशा गप्पा मारण्याचा योग आला. १९८५ ते १९९० या पाच वर्षात मी आणि माझ्या बँकेतील काही दुर्गप्रेमी सहकारी मिळून 'दर महिन्यास एक किल्ला' अशा प्रकारे आम्ही

भटकंती करीत होतो. त्या काळात चाळीसेक किल्ले पाहून झाले. श्री घाणेकरांच्या या पुस्तकाची मोठी मदतच त्यावेळी झाली. त्यावेळी किल्ल्यांवर विशेष अशी पुस्तके उपलब्ध नव्हती. किल्ल्यापर्यंत जाण्यासाठीचे रस्ते चांगले नव्हते, राहण्याची चांगली सोय नव्हती. सारा प्रवास एस.टी ने करावा लागे. परंतु त्यातही एकप्रकारची मजा होती. दुर्गमहर्षी गो नी दांडेकर आणि शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे यांनी अतिशय प्रतिकूल परिस्थितीत किल्ल्यांची केलेली भटकंती आठवते. या दोन महान व्यक्तिमत्त्वांचा, त्यांच्या लेखनाचा संदर्भ या पुस्तकात वेळोवेळी येतोच. पन्नास एक वर्षांपूर्वी दांडेकरांचे 'किल्ले', पं. महादेवशास्त्री जोशी यांचे 'महाराष्ट्राची धारातीर्थे', ग. ह. खरे यांचे 'सिंहगड', पुरंदरे यांचे 'किल्ले पुरंदर' अशी काही मोजकीच पुस्तके उपलब्ध होती. त्यामानाने किल्ल्यांची माहिती असलेली अनेक सचित्र पुस्तके आज सहज उपलब्ध आहेत. इंटरनेटवर देखील प्रचंड माहिती उपलब्ध आहे.  याचे कारण किल्ले भ्रमंती करणाऱ्यांची तरुणांची संख्या दिवसेंदिवस वाढतच आहे. अनेक प्रशिक्षण संस्था, शिबिरे, ट्रेकर ग्रुप्स, पुणे-मुंबईत उदयाला येत आहेत. हे चांगले लक्षण आहे. मात्र गडकिल्ले भटकताना पथ्यपाणी पाळणारे ट्रेकर्स त्यामानाने कमी आहेत.

पुस्तकाच्या शेवटी लेखक श्री घाणेकर यांनी आपल्या मनातली व्यथा मांडली आहे. जिथे मोठा इतिहास घडला, पराक्रम झाला, शिवरायांचा पदस्पर्श झाला ते किल्ले ढासळलेल्या अवस्थेत कसेबसे उभे आहेत. ऐतिहासिक कागदपत्रे, वस्तू यांच्याबद्दलची अनास्था वाढते आहे. सोईस्करपणे इतिहास कथन केला जातोय. झुंडशाही वाढत आहे. इतकं सारं असूनही आजची तरुणाई मोठ्या संख्येने किल्ल्यावर भटकंतीला जात आहे, मात्र त्यांना योग्य मार्गदर्शनाची गरज आहे. ‘भटकंती किल्ल्यांची..साद सह्याद्रीची’ या पुस्तकात दिलेल्या माहितीच्या, फोटोंच्या आणि नकाशांच्या आधारे ही तरुणाई एकेक किल्ला नक्कीच सर करतील अशी खात्री आहे.

( साद सह्याद्रीची-भटकंती किल्ल्यांची ( किल्ल्यांची माहिती ), प्र के घाणेकर, स्नेहल प्रकाशन, पुणे )

# २०. * स्मरणरंजनाचा गंध : पाने आणि पानगळ *




महानगरातल्या कोलाहलापासून, गोंगाटापासून दूर कुठेतरी हिमालयात शांतीच्या शोधात निघून जावे असे मनुष्य प्राण्याला सारखे वाटत असते. काही जण 'उद्या बघू' असे ठरवून वेळ मारून नेतात तर काही जण निश्चयपूर्वक हिमालयात जातात. मुळात मनुष्य प्राणी हा कळपात रमणारा. त्याने कितीही ठरवले की आपण

एकांतात रहावे पण हा एकांतवास अखेर मोडून पडतोच. जीव लावणाऱ्या माणसांच्या सहवासात, त्यांच्या निरपेक्ष वृत्तीमध्ये तो सचैल भिजत असतो. कर्तृत्वाची एकेक शिखरं पार करीत असताना तो या जिवलगांना विसरूच शकत नाही. एकेदिवशी तिन्हीसांजेच्या हुरहूर लावणाऱ्या संधीप्रकाशात जिवलगांच्या आठवणींचा अल्बम काढून तो निवांत बसतो, स्वतः त्यात भिजतो आणि दुसऱ्यांना देखील भिजवतो.

ज्यांच्या नावामध्ये तब्बल दोन वेळा वसंत ऋतूचे आगमन होते अशा मनस्वी, कलंदर आणि कलासक्त वसंत वसंत लिमये या अवलियाबद्दल काय सांगावे अन किती सांगावे. त्यांचा परिचय समृद्ध आहे. आयआयटीयन्स, गिर्यारोहक, छायाचित्रकार, 'हाय प्लेसेस' या कंपनीचे संस्थापक, उत्तम संवादक, कादंबरीकार, कथालेखक, स्तंभलेखक, नाट्यअभिनेते, इतिहास प्रेमी, रानफुल संस्थेचे संस्थापक, आणि बरंच काही ! हे सगळे गुण एकाच व्यक्तीत सामावलेले. आहे ना भारी ! वसंत लिमये यांचे जिवलग मित्र कवी सौमित्र म्हणतात ते खरं आहे. " वसंत वसंत लिमये हे एक सदैव भटकंतीला निघालेलं झाड आहे. देशीविदेशी, गावोगावी त्यांनी मैत्रीच्या हिरव्या रंगांची मैत्ररूपी पानं रुजवत ते स्वतःच एक समृद्ध झाड होऊन गेले आहेत. माणसं जमवण्याच्या,

मैत्री रूजवण्याच्या, जगणं सजवण्याचा या समृद्ध खेळाचं हिरवं रान करणाऱ्या वसंत वसंत लिमये यांचे नवे पुस्तक वाचावे असे."

हिरवीगार, तजेलदार पानं आणि काही जाळीदार पिंपळपानं यांनी सजलेल्या पुस्तकाचे नाव देखील वेगळं. 'पानं आणि पानगळ'. जीवनप्रवासाच्या विविध टप्प्यांवर, वळणावर वसंत लिमये यांना गवसलेली ही पानं चक्क आपल्याशी संवाद साधतात आणि लक्ष आठवांच्या अनोख्या प्रदेशात आपल्याला घेऊन जातात. ठाण्याच्या व्यास क्रिएशन्स यांनी अतिशय देखण्या स्वरूपात हे पुस्तक वाचक रसिकांच्या चरणी रुजू केले आहे. आपण पुस्तकाच्या मुखपृष्ठाच्या जणू प्रेमात पडतो. कारण तिथेही दोन पानं दिसतात. एक हिरवेगार, दुसरे जाळीदार. पुन्हा त्या दोन्ही पानांचा स्पर्शही वाचकाला भिन्न जाणवणारा, प्रत्यक्ष तो अनुभव घेतल्याशिवाय समजणार नाही इतका.! प्रस्तुत पुस्तकात एकूण एकोणतीस लेख आहेत. त्या एकोणतीस दिग्गज व्यक्तिमत्त्वांचा समृद्ध प्रवास, आठवणी, थक्क करणारं कार्य, यश, जिद्द, प्रतिकूल परिस्थितीवर केलेली मात, कधी सोनेरी तर कधी हुरहूर लावणारे क्षण, लिमये यांनी अगदी काळजातून शब्दबद्ध केलं आहे. कुत्रीमपणाचा कुठे लवलेशही नाही. प्रत्येक लेखाच्या डावीकडील पानावर रेखाटलेलं त्या त्या व्यक्तिमत्वाचं रेखाचित्र देखील तितकेच अप्रतिम. मुखपृष्ठ आणि रेखाटने साठी सुप्रसिद्ध चित्रकार

निलेश जाधव यांना द्यावेत शंभर पैकी दोनशे गुण. गेल्या पाच वर्षाच्या काळात जागवलेल्या जिवलगांच्या आठवणी यानिमित्ताने पुन्हा संकलित झाल्या आणि झाले त्याचे सुंदर लक्ष आठवांचे पुस्तक.

लिमये एके ठिकाणी म्हणतात " मला माणसं आवडतात. लोकांशी मैत्रीही सहज होते. माझं कुणाशीही जमतं. सेलेब्रिटी असेल तो कुठल्यातरी क्षेत्रात पारंगत असतो, त्याचा व्यासंग असतो आणि त्यामुळे त्या ओळखीतून मला नक्कीच काहीतरी मिळतं. माझा मनुष्यसंग्रह अफाट आहे. गेल्या कित्येक वर्षातील माझी ती कमाई आहे किंवा वैभव आहे आणि म्हणूनच मी स्वतःला भाग्यवान समजतो !" नोव्हेंबर २०२० मध्ये लिमयेंसरांनी वसवलेल्या स्वप्नवत गरुडमाचीला प्रत्यक्ष भेट देण्याचा सुंदर योग आम्हाला आला. त्यावेळी मित्रांच्या गोतावळयात मनापासून रमणाऱ्या लिमये सरांना बघितलं होतं.

जीवनप्रवासाच्या अनवट वाटांवरून चालणाऱ्या आणि काही वेगळं करू पाहणाऱ्या माणसांचे लिमये सरांना नेहमीच आकर्षण वाटत आले आहे. त्या व्यक्तिमत्वाच्या जणू ते प्रेमातच पडतात. स्वतःला समृद्ध करायचं असेल तर अशा सकारात्मक व्यक्तिमत्त्वांचं सान्निध्य लाभणं आवश्यक. लिमये सर स्वतः कलासक्त. कुठलीही कला त्यांना वर्ज्य नाही. त्यामुळे त्यांच्या

आयुष्यात येणाऱ्या विविध क्षेत्रात डोंगराएवढं काम करणाऱ्या मित्रांची, जिवलगांची यादी मोठी. प्रस्तुत पुस्तकात एकूण एकोणतीस लेख आहेत. ते फक्त लेखच नाहीत तर लक्ष आठवणींनी. स्मृतींनी, घटनांनी सजलेली ती रसरशीत पिंपळ पानं आहेत. उद्योग-व्यवसाय, साहित्य, पत्रकारिता, समाजकारण, राजकारण, अभिनय, कला, गिर्यारोहण, इतिहास, भटकंती अशा विविध क्षेत्रातली दिग्गज मंडळी लिमये सरांचे परम मित्र, स्नेही आहेत ही आपल्यासाठी किती मोठी गोष्ट. या मंडळींच्या सहवासात घालवलेल्या त्या सोनेरी क्षणांचे इंद्रधनुष्य लिमये सर आपल्याला दाखवतात तेव्हा आपण त्या शब्दरंगात हरवून जातो. लिमये सरांनी त्या त्या व्यक्तिमत्वाचे रंग, रूप, गंध चित्ररूप शब्दशैलीने रेखाटली आहेत. सर्वच एकोणतीस व्यक्तिमत्त्वांचा परिचय इथे करून देणे केवळ अशक्य. तरी काही वानगीदाखल त्याची थोडी झलक देतो.

'अस्वस्थ संध्याछाया' या पहिल्याच लेखातून लिमये सर आपल्या आईंच्या काळजीने चिंतातुर होतात. आईच्या समवेत आपणही आता वृद्धत्वाच्या अटळ अशा दिशेने वाटचाल करू लागलो आहोत याचीही जाणीव त्यांना होतेच. एके ठिकाणी लिमये म्हणतात " माझी कामं, व्याप, आणि छंद यातून वेळ काढून आईकडे लक्ष देता येत नाही याची खंत मनाला कुरतडत असते.

चिडचिड होते, स्वतःच रागही येतो पण काही काळाने मी शांत होतो आणि स्वतःचीच समजूत घालतो." म्हातारपणाची एक वेगळीच मानसिकता लिमये सरांनी अधोरेखित केली आहे.

'इतिहासाला स्मृतिभ्रंश झाला आहे ' या लेखातून जगातल्या सर्वोच्च एव्हरेस्ट शिखराला गवसणी घालणाऱ्या जॉर्ज मॅलरीची चित्तथराक कहाणी, प्रवास आणि हुरहूर लावणाऱ्या आठवणी आपल्याला अस्वस्थ करतात. मूळचे गुजराती असलेले डॉ अनिल काणे, 'wind energy' या विषयातील जगप्रसिद्ध तज्ञ पाणी समस्ये संदर्भात गुजरात येथे येऊन 'कल्पसर' या जगावेगळ्या संकल्पनाची स्थापना करतात आणि तो महाकाय प्रोजेक्ट साकारण्याचे स्वप्न बघतात. मात्र नोकरशाहीच्या मनमानी कारभारापुढे आणि राजकीय उदासीनतेमुळे हा प्रकल्प बाजूला सारला जातो. लिमये सरांनी शतकातला हा प्रोजेक्ट प्रत्यक्षात साकारणं किती आवश्यक आहे याचा उहापोह 'कहाणी कल्पसर ची' या लेखात केला आहे. 'ते निळसर डोळे' या लेखातून उदयोग महर्षी जे आर डी टाटा यांच्यासोबत घालवलेले अविस्मरणीय क्षण शब्दबद्ध केले आहेत. 'अचानक गवसला खजिना' या लेखातून ज्ञानपीठकार कुसुमाग्रज यांचा सहवास लिमये सरांना लाभला त्या आठवणी नक्की वाचा. ज्येष्ठ पत्रकार, कादंबरीकार अरुण साधू यांच्याबद्दलच्या आठवणी शब्दबद्ध झालेत. प्रख्यात कवी,

गीतकार, दिग्दर्शक  गुलज़ारजी यांच्या ठाण्यातील एका कार्यक्रमाच्या निमित्ताने लिमये सर आले असता त्या क्षणांचे साक्षीदार होताना जागवलेल्या आठवणी, गिरिविहार कांचनगंगा ८८ या मोहिमेच्या निमित्ताने ऍडमिरल एम पी आवटी या उत्तुंग व्यक्तिमत्वाचा परिचय झाला, पुढे त्यांचा सहवासही लाभला, गरुडमाचीला त्यांचे येणं झालं. त्या हुरहूर लावणाऱ्या आठवणींचा गोफ आपल्याला वाचायला मिळतो. ज्येष्ठ पत्रकार, साहित्यिक अशोक जैन यांच्यासोबत दिल्ली येथे घालवलेल्या क्षणांची चित्रे तसेच पुढे रानफुल शिबिराच्या निमित्ताने आणि नंतर गरुडमाचीला दिलेल्या भेटीच्या आठवणी शब्दबद्ध झाल्या  आहेत. ग्रंथाली या ग्रंथ चळवळीचे संस्थापक आदरणीय दिनकर गांगल यांचा लाभलेला सहवास, मार्गदर्शन, त्यांच्या व्यक्तिमत्वाचे अनेक पैलू वाचायला मिळतात. अभिनय क्षेत्रातले लखलखते तारे म्हणजे नासिरुद्दीन शहा, सचिन खेडेकर आणि सुबोध भावे यांच्यावरचे लेख मुद्दाम वाचण्यासारखे. माजी पंतप्रधान अटलजी यांच्यावरचा 'अटल, अविचल, अविरत' हा लेख आणि संरक्षणमंत्री, परममित्र मनोहर पर्रीकर यांच्यावरचे लेख डोळयांच्या कडा ओलावतात. नटसम्राट लागूंच्या सहवासात घालवलेले सुवर्ण क्षण, त्यांचेशी मारलेल्या गप्पा, याचे स्मरण देत असतानाच त्यांच्यातील निखळ माणूसपण शब्दबद्ध करण्याचा प्रयत्न लिमये सर करतात. 'संस्कार'

या लेखातून दुर्गमहर्षी गो नी दांडेकर आणि शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे यांच्या अनेक आठवणी आपल्याभोवती रुंजी घालतात. 'अटळ, अपूर्ण तरीही परिपूर्ण' हा पुस्तकातला शेवटचा लेख. लिमये सर आपल्या बाबांच्या अनेक आठवणींमध्ये रमतात, व्याकुळ होतात. आपले बालपण, खाल्लेल्या खस्ता, त्यांची शिकवण, त्यांचे थोरपण आणि अखेरच्या दिवसातला त्यांचा निश्चयी, करारी, ठाम स्वभाव हे सारे पैलू लिमये सर अचूक व भावूक शब्दांमध्ये आपल्यापुढे उभे करतात.

वसंत वसंत लिमये या अफाट आणि अचाट व्यक्तिमत्वाचे हे सहावे पुस्तक. कथा, कादंबरी, ललित लेख, प्रवास वर्णन अशा विविध साहित्य प्रकारात त्यांनी विपुल लेखन केले आहे. पाने आणि पानगळ हा व्यक्तिविशेष लेख संग्रह मात्र वेगळा वाटतो. कारण यामध्ये गुंफल्या आहेत जिवलगांच्या, प्रियजनांच्या अनेक आठवणी, घटना, नोंदी, स्मरणरंजन आणि किस्से. पुस्तकाच्या अगदी शेवटी लिमये आपल्याशी संवाद साधतात. " लेखन हा माझ्यासाठी शोधप्रवास आहे आणि तो आनंद उदंड आहे. शिखरं असंख्य आहेत आणि प्रवास सुरूच राहणार आहे." अगदी खरं ना?

(पाने आणि पानगळ ( ललित / व्यक्तिपर लेख संग्रह ), वसंत वसंत लिमये, व्यास क्रिएशन्स, ठाणे )

# २१. ** मंटोच्या कथांचे समृद्ध अवकाश **




" असं म्हणू नको की एक लाख हिंदू मेले आणि एक लाख मुसलमान मेले त्याऐवजी असं म्हण की दोन लाख माणसं मेली. दुःख याचं आहे, मेल्यामुळे मरणाऱ्यांना काही फायदा झाला नाही. एक लाख हिंदू मारून मुसलमानांना वाटलं असेल की हिंदू धर्म

संपला परंतु तो जिवंत आहे आणि राहील. त्याचप्रमाणे एक लाख मुसलमान मारून हिंदूंना वाटलं असेल की इस्लाम संपला. ज्या लोकांना वाटतं की बंदुकींनी धर्माची शिकार करता येते ते मूर्ख आहेत. धर्म, पंथ, दया, विश्वास, सच्चेपणा, श्रद्धा हे सगळं माणसाच्या शरीरात नव्हे, आत्म्यामध्ये असतं. सुरे, चाकू आणि गोळीने हे कसं नाहीसं करणार? " (सहाय )

१. " हे बघ मित्रा, तू ब्लॅकमार्केटचे पैसेही घेतलेस आणि कसलं वाईट पेट्रोल दिलंस की एकसुद्धा दुकान जळलं नाही." २. "आग लागली आणि सगळा मोहल्ला जळून गेला. फक्त एक दुकान वाचलं. दुकानावर बोर्ड होता : इथे इमारत सजविण्याचे सगळे सामान मिळते."

३. "दंगेखोरांनी घरमालकाला मोठ्या मुश्कीलने खेचून घराबाहेर काढले. कपडे झटकून तो उभा राहिला आणि दंगेखोरांना म्हणाला, " तुम्ही मला मारून टाका, परंतु खबरदार माझ्या रुपया-पैशांना हात लावाल तर."

४. " दोन मित्रांनी दहाबारा मुलींमधून एक निवडली. त्या मुलीने नाव सांगताच तो म्हणाला 'आम्हाला तर सांगितलं होतं की तू दुसऱ्या धर्माची आहेस'. ती मुलगी म्हणाली 'तो खोटं बोलला होता' हे ऐकून तो आपल्या मित्राला म्हणाला ' त्या हरामखोराने

आपल्याला फसवलं. आपल्याच धर्माची मुलगी दिली आपल्याला. चल, परत करू या.!" ( अशुभ काळे समास )

एखाद्या ज्वालामुखीतून लालभडक, तपकिरी रंगाचा तप्त लाव्हारस उसळी मारून एका क्षणात आभाळात उडावा तसेच एकेक शब्द, एकेक विचार, एकेक अनुभव, निरीक्षणे वाचकाच्या अंतरंगात भिनवून देणाऱ्या एका सशक्त उर्दू लेखकाचे हे जळजळीत शब्द आहेत. अनोखी संवादमय भाषाशैली, अनुभूतींच्या विस्तीर्ण कक्षा, परंपरेची सारी बंधने तोडून आपली प्रखर मतं आपल्या लेखनात प्रामाणिकपणे मांडणारा लेखक, आणि अशी सारी वैशिष्ट्ये एकाच व्यक्तीत सामावलेली ! . त्याचे लेखन वाचून आपण जणू निःशब्द होतो. बरोबर. अगदी बरोबर ओळखलंत. सआदत हसन मंटो (११ मे १९१२ - १८ जानेवारी १९५५ ) असे त्या महान लेखकाचे नाव. असा लेखक शतकातून एकदाच निर्माण होत असतो.

असं म्हणतात की एखाद्या लेखक-कवीचे चरित्र जाणून घ्यायचे असेल तर त्याच्या साहित्यकृतींचे प्रथम वाचन करा. अगदी त्याच प्रमाणे मंटो हा विलक्षण लेखक जाणून घ्यायचा असेल तर प्रथम तुम्हाला मंटोच्या कथांचे वाचन करणे क्रमप्राप्त आहे. या जणू त्याच्या आत्मकथाच आहेत. यामधूनच मंटो

आपणाला हळूहळू उलगडत जातो, समजला जातो. खरं सांगायचं म्हणजे जिवंतपणी मंटो सारखा लेखक कुणाला झेपला नाही आणि मला नाही वाटत त्याच्या मृत्यूनंतर देखील तो कुणाला झेपला असेल.! मंटोच्या कथांच्या गाभ्यापर्यंत पोचणे म्हणजे एक महान अवघड काम आहे, मंटोच्या कथांमध्ये कधीही सारांश, तात्पर्य अथवा संदेश सापडणार नाही. मंटो वाचकांवरच सारे सोपवून देतो. वाचक मात्र विचारांच्या वावटळीत भिरभिरत राहतो.

सआदत हसन मंटो. एक विलक्षण रसायन. धर्म, भाषा आणि देशाच्या सीमारेषा ओलांडून माणुसकीच्या नजरेतून हिंदुस्थान-पाकिस्तानच्या फाळणीतली दाहकता, कुरूपता, विद्रुपता, सत्यता आपल्या प्रहरात्मक शब्दशैलीत साहित्याच्या माध्यमातून समाजासमोर निर्भीडपणे मांडणारा एक मनस्वी कवी, लघुकथा लेखक. मंटोच्या जीवनातली सर्वात दुःखदायक घटना म्हणजे फाळणी. त्याबद्दल स्वतः मंटो म्हणतो " १५ ऑगस्ट १९४७ रोजी हिंदुस्थान स्वतंत्र झाला. त्याचक्षणी त्याचे दोन तुकडे झाले. पाकिस्तान निर्माण होतानाच स्वतंत्र झाला. परंतु माणूस धर्मवेडाचा, दुराग्रहाचा गुलाम झाला. असभ्य आणि जंगलीपणाचा गुलाम झाला." दोन देशांना विभागणाऱ्या या फाळणीचे प्रत्यक्ष चटके, त्यातली वेदना मंटोने सोसल्या. शांततेचा, एकात्मतेचा पुरस्कार करणाऱ्या मंटोला ही फाळणी म्हणजे एक जीवघेणा शाप

वाटला. फाळणीच्या जखमा त्याच्या संवेदनशील मनावर कायमच्या उमटल्या. फाळणीतली क्रूरता, भीषणता पाहून मंटो हबकून गेला. फाळणीच्या घटनांचे आघात त्याच्या मेंदूला सहन झाले नाहीत. इतके, की काही दिवस मंटोला वेड्यांच्या इस्पितळात ठेवण्यात आलं. आणि या घुसमटीतून बाहेर पडण्याचा एकमेव मार्ग म्हणजे लेखन. होय..लेखनच. कथा, कविता, निबंध, नाटक अशा विविध माध्यमातून मंटो व्यक्त होऊ लागला. दाहक अनुभूतीच्या मुशीतून कागदावर उमटलेले हे लेखन वाचकांच्या मनावर गारुड करू लागले.

मंटोचा जन्म हिंदुस्तानांतील पंजाबमधला. प्राथमिक शिक्षण अमृतसर इथले. करियरची सुरवात पत्रकारितेने आणि लेखनाची सुरवात अनुवादाने झाली. पुढे हिंदी चित्रपटसृष्टीशी संबंधित लिखाण, नाटक मग कथा असा लेखन प्रवास सुरु. मुंबईच्या मायानगरीत मंटो रमला नाही. मुंबईच्या मुक्कामात त्याने इथली बकाल वस्ती, वेश्यावस्ती जवळून अनुभवली, तिथे तो राहिला. इथलं जगणं, अस्वस्थता, लैंगिकता त्याने आपल्या कथांमधून रेखाटली. त्या काळात मंटोने कथालेखन विश्वात आपली वेगळी, स्वतंत्र ओळख निर्माण केली. पुढे तर लेखन हा त्याचा श्वास आणि उपजीविकेचे एकमेव साधन ठरलं. स्वातंत्र्यप्राप्तीनंतरची फाळणी ही तर मंटोसाठी जीवघेणी ठरली. फाळणीनंतर तो पाकिस्तानातील

लाहोरला गेला. हा त्याचा निर्णय चुकीचा ठरला हे त्याच्या खूप उशिरा लक्षात आले. पाकिस्तानात देखील मंटोचे लेखन वादग्रस्त ठरू लागले, इतके की त्याच्या अनेक कथा अश्लील ठरवून त्याच्यावर खटले भरण्यात आले. यामध्ये मानसिक, शारीरिक त्रासाला आणि आर्थिक ओढाताणीला मंटोला वारंवार सामोरे जावे लागल्याने मंटोने दारूला जवळ केले. फाळणीतली क्रौर्यता, हतबलता आणि वैयक्तिक जीवनात आलेले नैराश्याने मंटो पुरता खचला. दारूने शांतपणे मंटोचा ताबा घेतला. आणि.. वयाच्या अवघ्या त्रेचाळिसाव्या वर्षी मंटो हे जग सोडून निघून गेला.

मंटोचे एकूण बावीस कथासंग्रह प्रकाशित झालेत. त्याचा पहिला कथासंग्रह १९३६ मध्ये प्रकाशित झाला. एकूण वीस कथासंग्रह, एक कादंबरी, अनुवादित साहित्य, निबंध संग्रह, आणि काही रेडिओ नाटके मंटोच्या नावावर आहेत. मंटोने आपले सारे लेखन हे उर्दू भाषेत लिहिले आहे. मंटोच्या एकूण साहित्यसंपदेवर आणि त्याच्या जीवनप्रवासावर प्रभावित होऊन अनेक लेखक, कवी, समीक्षकांनी मंटोचे लेखन विविध भाषांमध्ये अनुवादित केले. त्यापैकी हिंदी साहित्यसृष्टीतले एक महत्वाचे ज्येष्ठ लेखक, नाटककार, कवी, समीक्षक डॉ नरेंद्र मोहन यांनी मंटोच्या अनेक कथांचा हिंदीमध्ये अनुवाद केला. एकप्रकारे डॉ नरेंद्र मोहन हे मंटो शब्दशः जगले.

आपल्या ठाण्यातील सुप्रसिद्ध लेखिका डॉ वसुधा सहस्रबुद्धे या देखील डॉ नरेंद्र मोहन यांच्याप्रमाणेच मंटोच्या साहित्याने अक्षरशः भारावून गेल्या.मुंबईच्या सिद्धार्थ महाविद्यालयात हिंदी विभागात त्यांनी प्राध्यापक म्हणून काम केले. ख्यातनाम हिंदी नाटककार डॉ शंकर शेष यांच्या नाटकांवर, साहित्यावर त्यांनी पीएचडी केली आहे. आत्तापर्यंत डॉ सहस्रबुद्धे यांनी रेडिओसाठी अनेक वेळा लेखन केले आहे, त्याचप्रमाणे मंटोप्रमाणेच अन्य दिग्गज लेखकांच्या साहित्यकृतींचे त्यांनी संपादन करून ते साहित्य मराठीत अनुवादित करण्याचे मोलाचे काम केलं आहे. डॉ नरेंद्रजींनी संपादित केलेल्या 'मंटो की कहानिया' या पुस्तकातील निवडक बावन्न कथांचा मराठी अनुवाद डॉ सहस्रबुद्धे यांनी केला. मंटोच्या शब्दकळेला, कथेच्या आकृतिबंधाला  कुठेही बाधा न आणता त्या कथांचा मराठी अनुवाद करणे म्हणजे शिवधनुष्यच उचलणे. मंटोच्या साहित्याचा प्रवास प्रथम उर्दू मग हिंदी आणि आता मराठीत असा झाला. 'मंटोच्या निवडक कथा' या नावाने संपादित आणि अनुवादित केलेल्या कथांचे मौलिक पुस्तक २०१६ मध्ये नागपूरच्या विजय प्रकाशनने प्रकाशित केले. त्या प्रकाशन समारंभास मी उपस्थित होतो. डॉ सहस्रबुद्धे मनोगतात म्हणतात " मंटोने वेगवेगळ्या अस्पर्शित विषयांवर, वेगळ्या ढंगात आणि वेगळ्या दृष्टीकोनातून कथा लिहिल्या. मंटोच्या कथा

वाचकांच्या मन-बुद्धीला विचार करायला लावणाऱ्या, व्याकुळ करणाऱ्या आणि आतपर्यंत हेलावून टाकणाऱ्या आहेत. त्याने जे लिहिलं ते त्याने भोगलं आहे."

मंटोने स्वतः लिहिले आहे " असंही होऊ शकतं की सआदत हसन मरेल आणि मंटो जिवंत राहील " त्याचं म्हणणं अगदी खरं ठरलं. १८ जानेवारी १९५५ रोजी मंटो हे जग सोडून गेला. मात्र आज एकविसाव्या शतकात मंटो जिवंत आहे आणि पुढील शतकातही तो जिवंत राहण्याची शक्यता आहे. आज प्रत्येक स्तरावर, वर्गावर, भाषेच्या पाठकांवर मंटोचा इतका प्रभाव आहे की तो जणू त्यांचा अविभाज्य भाग बनला आहे. अशा महान लेखकाला हिंदुस्थान किंवा पाकिस्तानच्या पिंजऱ्यात कैद करून ठेवता येणं शक्य तरी आहे का?

( मंटोच्या निवडक कथा, संपादन आणि अनुवाद डॉ वसुधा सहस्रबुद्धे, विजय प्रकाशन, नागपूर )

# २२. * नादवेधः  एक अविस्मरणीय अक्षर-मैफल *




"'यमन' मध्ये विरहातली बैचैनी, प्रेमातलं साफल्य, जीवनातली निरागसता, निसर्गातलं सौंदर्य, भक्ती, विनवणी, वत्सलता अशा सगळ्या भावछटा समर्थपणे रंगवण्याची कुवत असल्यामुळे असेल कदाचित; भक्तिरसाचे अभंग, भजनं, विरहातल्या गझला, नाट्यगीतं, भावगीतं, लावण्या, सिनेसंगीत अशा सर्वांमध्ये यमन दिसतो. एकदा शिष्यानं गुरूला विचारलं

"आपण गात आहात तो कोणता राग आहे?" गुरुजींनी म्हणाले " बेटा, ये मन है ! "

"उन्हाळ्यातली रणरणती दुपार, जुनी पडकी उध्वस्त धर्मशाळा, तिच्या कौलावर बसून 'एकांत गीत' गाणारा पारवा, दया पवारांच्या कवितेतली श्रमिक स्त्री, हे सर्व आठवावं अशा रखरखत्या दुपारी वाऱ्याच्या हळुवार झुळकेनं फुंकर घालावी, तसे 'सारंग' चे सूर वाटतात."

"साधा-सरळ जाणारा रस्ता म्हणून आपण एखाद्या रस्त्यानं, निर्धास्तपणे चालायला लागावं आणि काही ठिकाणी चालणं अवघड व्हावं, तसा 'मुलतानी'राग भारतीय संगीतात भेटतो.! "

" 'तोडी' राग म्हटलं की, पूर्वी हातोडीच आठवायची. हा-तोडी अशा रोखठोख पद्धतीनं गायलेले, अनेक तोडी कानावर पडले होते ; म्हंणून असेल कदाचित. पण जसजशी तोडीची नशा चढत गेली, तसतसं वाटायला लागलं की, तोडी रागाला खरोखरच तोड नाही.!"

"माझ्या आनंदलोकात चंद्र मावळत नाही...दर्या अथांग प्रेमाचा कधी वादळत नाही... या कुसुमाग्रजांच्या ओळी वाचताना हंसध्वनीचे सूर आठवले. शांतता, तृप्तता, आनंद हे भाव घेऊन येणारे ते सूर ! "

"आयुष्यात वाट्याला आलेलं एकाकीपणाचं, प्रेमभंगाचं अगर अपेक्षाभंगाचं दुःख, आकांडतांडव न करता सोशिकपणे स्वीकारणारी 'शिवरंजनी ! " "आपल्या माणसांकडून उपेक्षा होण्याचं अगर फसवलं जाण्याचं दुःख, हे जीवनातलं सर्वात मोठं दुःख. त्याविषयी आपण उघडपणे तक्रारही करू शकत नाही. अशा प्रकारची वेदना भैरवीचे सूर समर्थपणे व्यक्त करतात. भैरवी म्हणजे अतृप्ती, बेचैनी, हुरहूर, अपूर्णत्व."

हिंदुस्थानी रागांची इतक्या सुंदर, प्रभावी आणि काव्यात्मक संवाद शैलीत लिहिलेली रसाळ माहिती यापूर्वी मी तरी कधीही वाचली नव्हती. हिंदुस्थानी रागांवर आधारित लिहिलेली अनेक पुस्तके बाजारात सध्या उपलब्ध आहेत. संगीताचा अभ्यास करण्याऱ्यांसाठी, संगीताच्या परीक्षेस बसण्यासाठी ती उपयुक्तही असतील, त्यातून रागांची सखोल माहिती देखील मिळेल, मात्र रागांचे सौंदर्य म्हणजे काय, गाणं म्हणजे काय?त्याचा हेतू काय हेच जर उमजणार नसेल तर त्या जाडजूड, रुक्ष पुस्तकांचा उपयोग तरी काय? असो. प्रसिद्ध संगणक तज्ञ, लेखक, आस्वादक श्री अच्युत गोडबोले आणि शास्त्रीय संगीताचा अभ्यास करणाऱ्या, त्याचे रीतसर शिक्षण घेणाऱ्या सुलभा पिशवीकर या बहीण-भावांनी "नादवेध" नावाचे एक अप्रतिम पुस्तक लिहिलं आहे. राजहंस या प्रख्यात प्रकाशन संस्थने नादवेध हे पुस्तक २००५ मध्ये प्रकाशित

केले. हे पुस्तक संगीताचा अभ्यास करणाऱ्यासाठी तर उपयुक्त आहेच परंतु एक जिज्ञासा म्हणून संगीताकडे वळलेल्या अनेक कानसेनांसाठी देखील हे पुस्तक उपयुक्त आहे हे सर्वात महत्वाचं.

या सुंदर पुस्तकामधून दोघेही वाचक रसिकांशी अगदी मुक्त संवाद करीत संगीताच्या, रागांच्या उगमाची, विस्ताराची, अनेक गायकांची, संगीतकारांची माहिती, त्यांच्या आठवणी, किस्से अगदी सहजपणे देतात. हा सहजपणा, अकृत्रिमपणा आणि भाषेचा लहेजा हेच या पुस्तकाचे यश आहे. साधारणतः २००५ पूर्वी एका वृत्तपत्रामधून या दोघांचे 'नादवेध' हे सदर दर रविवारी प्रकाशित होत असे. संगीतावर प्रेम करणाऱ्या अनेकांचा या लेखमालेला प्रचंड प्रतिसाद लाभला. त्यातील सहजसोपी लेखन शैली सर्वांना भावून गेली. अनेक वाचकांच्या आग्रहाखातर पुढे या सर्व लेखांचे सुंदर पुस्तकही झाले. अनेक ठिकाणी संगीत मैफिलींना उपस्थित राहिल्यानंतर रागांची मांडणी, विस्तार, सुरांचे सौंदर्य हे सारं संचित एखाद्या टिपकागदासारखे टिपून या दोघांनी सुरांचे अभिजात सौंदर्य आपल्या अनोख्या शब्दांमध्ये पकडण्याचा सुंदर प्रयत्न केला. सर्वात महत्वाचे म्हणजे रागविस्ताराचे तांत्रिक अंग किंवा शास्त्रीय बाजूंवर भर न देता प्राचीन काळातले ते राग आजच्या भावगीत, नाट्यगीत, चित्रपटगीतांमध्ये कसे चपखल बसले आहेत, त्याचा वापर कसा अचूकतेने केला आहे याचेही विश्लेषण या पुस्तकात

वाचायला मिळते. पुस्तक वाचताना त्या त्या रागाची माहिती मिळतेच पण त्याचबरोबर काही कवितांचा आस्वाद, काही वाङ्मयीन दाखले, किस्से यामुळे वाचक संमोहित होतो, नादमय होतो. एकदा का हे पुस्तक हाती पडले की थेट भैरवी पर्यंतचे सारे लेख आपण एकाच बैठकीत वाचून काढतो इतके हे लेखन प्रत्ययकारी झालं आहे.

सर्वच वाचकांना माहिती आहेच की लेखक अच्युत गोडबोले आणि सुलभ पिशवीकर या दोघांनी आपल्या अकॅडेमिक करियर मध्ये मोठे यश संपादन केले आहे. अच्युत गोडबोले हे तर त्या काळात दहावीच्या परीक्षेत बोर्डात सोळावे आले होते. गणित, विज्ञान विषयात प्राविण्य मिळवून आयआयटी या मातब्बर संस्थेतून त्यांनी रसायन अभियांत्रिकीची पदवी मिळवली. पुढे भारतीय तंत्रज्ञान संस्थेतून (आयआयटी) त्यांनी रसायन अभियांत्रिकीची पदवी मिळविली. अनेक कंपन्यांच्या मुख्य कार्यकारी अधिकारी (CEO) पदी काम पाहिलेले. त्या निमित्ताने अनेक देशांना भेटी दिल्या. पण एका क्षणी गलेलठ्ठ पगाराची नोकरी सोडून ते पूर्णवेळ लेखनाकडे वळाले. संगणकीय ज्ञानापेक्षा त्यांना संगीत, मानसशास्त्र, अर्थशास्त्र, यामध्ये रुची वाढून त्यावर मोलाचे संशोधन करून उत्तमोत्तम ग्रंथांची निर्मिती केली. असे का? यावर एकाच शब्दात उत्तर देता येईल. आवड. प्रचंड आवड. अगदी

त्याच प्रमाणे सुलभाताई देखील स्कॉलर. दहावीच्या परीक्षेत आठवा क्रमांक. अर्थशास्त्र व राज्यशास्त्र घेऊन एम..ए, मराठी विषयावर विलक्षण प्रभुत्व, अनेक पारितोषिके. गानतपस्विनी मोगुबाई कुर्डीकर, किशोरीताई आमोणकर, पं. प्रभुदेव सरदार, यांच्याकडे संगीताचे रीतसर शिक्षण. दोन वेळा शास्त्रीय संगीताचे पारितोषिक. इतकी सारी समृद्ध संपदा पाठीशी घेऊन सर्व सामन्यांना कळेल अशा सुंदर भाषाशैलीत संगीताचे वर्म उलगडण्याचे महत्वाचे काम त्यांनी या पुस्तकात केलं  आहे.

आपणाला हे 'नाद वेड' कसे लागले याचे सुंदर विवेचन अच्युतजींनी मनोगतात केलं  आहे. एकेक गाण्यासाठी, कॅसेट मिळवण्यासाठी केलेला आटापिटा, चालींचे वर्म, गाण्याची गोष्ट कळण्यासाठी प्रत्यक्ष संगीतकारांकडे कसे गेलो, अनेक जुने संदर्भ ग्रंथ कसे अधाशासारखे वाचले, हिंदुस्थानी संगीत ऐकतानाच मोत्झार्ट, बाख, बीथोवन हे विदेशातील संगीतकार कसे भावले, याचे सुरेख वर्णन केले आहे. एकेठिकाणी अच्युतजी म्हणतात " रागदारीबद्दल एक असा सूर येतो की 'आम्हाला काही कळत नाही बुवा' पण खरं सांगायचं, तर त्यातलं काही 'कळण्याच्या' मागे धावण्यापेक्षाही त्यातलं 'भावण्याच्या'दृष्टीनं 'ऐकणं' जास्त महत्वाचं आहे.!" पटतंय ना मित्रानो?

नादवेध पुस्तकात एकूण चौसष्ट लेख आहेत. अनेक लेखांमध्ये विविध रागांच्या उत्पत्तीची, बंदिशींची, व त्यावर बेतलेल्या अनेक संस्मरणीय गाण्यांची रंजक माहिती दिली आहे. या अभिजात नादसोहळ्यात, अक्षर- मैफिलीत रसिक वाचक बुडून जातो. या दोन्ही टॅलेंट लेखकांच्या नजरेने टिपलेल्या रागांचे अनेक अविष्कार, रागांचा अनोखा परिचय वाचून आपण थक्क होतो. हे पुस्तक साकारण्यासाठी त्यांनी घेतलेली अपार मेहनत, अभ्यास वाचकास प्रत्ययाला येतो. इतक्या सर्व रागांच्या रोचक अंगांचा परिचय या लेखात करून देणे केवळ अशक्य आहे. पुस्तकातील लेख वाचताना सापडलेली काही मौक्तिके वाचकांसाठी देत आहे.

किशोरीताई एकदा म्हणाल्या होत्या " अरे, गाणं हे हृदयाला भिडलं पाहिजे. ऐकताना त्याचा बुद्धीशी काहीच संबंध नाही." काही ग्रंथांची दुर्मिळ माहिती मिळते. शारंगदेव याने संगीतरत्नाकर या नावाचा एक महान ग्रंथ लिहिला. चालुक्य घराण्यातल्या सोमेश्वर याने इ .स. ११३० साली लिहिलेल्या 'मानसोल्लास' मध्ये त्या काळच्या संगीताच्या अवस्थेची वर्णनं मिळतात. सुफी संतांनी प्रथम कव्वालीची रचना केली. ख्यालाची रचना सर्वप्रथम अमीर खुश्रूनं केली. अकबराच्या काळात धृपद गायकीची खूप भरभराट झाली. तानसेन हा ध्रुपदियाच होता. " मनाचं रंजन करणारा तो राग.

' रज्जयति इति राग- : अशी रागाची सर्वमान्य अशी व्याख्या आहे. सुप्रसिद्ध चित्रकार प्रभाकर बरवे म्हणतात " शास्त्रीय संगीत ऐकताना त्याचं अस्तित्व चहूबाजूंनी जाणवतं. आपण ढगांचे बनलो आहोत आणि ढगाप्रमाणे सुरांच्या अवकाशात मनसोक्त तरंगत आहोत, असाही भास होतो." महान गायिका बेगम अख्तर म्हणत " सूर हाच खरा ! कोणता राग गायला, कुठला ताल होता वगैरे गोष्टी अगदीच गौण असतात. "

हे सारं संचित वाचत असताना न कळत वाचक देखील प्रगल्भ होत जातो. पुस्तकाच्या अगदी शेवटी तीन परिशिष्टे दिली आहेत. रागांवर आधारलेली हिंदी, मराठी चित्रपट व भावगीते तसेच नाट्यगीते यांचा अभ्यासपूर्ण तपशील दिला आहे. रागाचे नाव, गायक-संगीतकाराचे नाव, चित्रपट आदी तपशील दिला आहे. ज्यांना संगीत खूप कळते आहे, जे संगीतापासून खूप दूर आहेत आणि ज्यांना उत्तम श्रोता बनायचे आहे अशा सर्वांनीच एकदा तरी 'नादवेध' हे अप्रतिम पुस्तक वाचायलाच हवं .

(नादवेध ( हिंदुस्थानी रागांची माहिती ), अच्युत गोडबोले आणि सुलभा पिशवीकर, राजहंस, पुणे )

# २३. ** जुन्या ठाणे नगरीचा समृद्ध दस्तावेज ***




ठाणे रेल्वे स्टेशन केवळ भारतातीलच नव्हे तर आशिया खंडातील पहिलं रेल्वे स्टेशन म्हणून ओळखलं जातं. १६ एप्रिल १८५३ रोजी पहिली प्रवासी रेल्वे गाडी बोरीबंदर ते ठाणे या

मार्गावर धावली. १९६८ मध्ये ठाणे ते बोरीबंदरचे तिकिट केवळ दहा आणे होतं  आणि १९७० साली मासिक पास पंधरा रुपये इतका होता. ठाण्यातला सर्वात पहिला आणि जुना रस्ता म्हणजे ठाणे स्टेशन ते कलेक्टर कचेरी हा होय. याला सुभाष पथ हे नाव दिले आहे. हा स्टेशन रोड तब्बल १६५ वर्षे जुना आहे. प्राचीन काळात ठाण्यात एकूण साठ तलाव होते, काळाच्या ओघात काही नष्ट होऊन आता केवळ ३०-३५ तलाव शिल्लक राहिले आहेत. मासुंदा तलाव हा सर्वात प्राचीन,, ८३० वर्षांपूर्वीचा.  इ.स. १५३८ च्या सुमारास ठाण्याचा विस्तार ४ मैल इतकाच होता, ठिकठिकाणी एकूण साठ देऊळे होती. मासुंदा तलावातल्या पाण्याच्या लाटा श्रीकौपिनेश्वर मंदिराच्या पायऱ्यांशी हितगुज करायच्या. जांभळी नाक्यावरचे पेढ्या मारुतीचे प्राचीन मंदिर आहे. पेढ्याचा नैवैद्य प्रत्यक्ष खाणारा ठाण्याचा हा मारुतीराया हा कदाचित जगातील एकमेव देव असावा.! त्याच्या मुखात एकूण सव्वा किलोपर्यंत पेढे मावतात. खूप पूर्वी जांभळाची झाडे इथे खूप असल्याने या नाक्याला जांभळी नाका हे नाव पडले, पूर्वी त्याला दूधनाका देखील म्हणत. गावदेवी रिक्षा स्टॅन्ड जवळील मारुती मंदिर हे इ.स. १८४८ सालचे आहे. ही मूर्ती शेतजमिनीत सापडली. रेल्वे स्टेशनजवळचे पोस्ट ऑफिस सर्वात जुने, १८५६ मध्ये ते अस्तित्वात आले. टेंभी नाक्याने जेवढ्या राजकीय आणि

सामाजिक चळवळी अनुभवल्या तेवढ्या कुठल्याच नाक्याने अनुभवल्या नसतील. नौपाडा इथली आशिया खंडातील सर्वात पहिली गृहनिर्माण सोसायटी म्हणजे ब्राह्मण सोसायटी. १९३१ च्या पूर्वी तिथे मिठागरे होती. लोकमान्य टिळकांच्या पदस्पर्शाने पावन झालेली चरई मधली शेणवे आळी म्हणजेच आत्ताची लोकमान्य आळी. इ.स. १२९२ मध्ये युरोपियन प्रवासी मार्को पोलो हा घोडबंदर इथे आला होता. पर्शियन आखातातून समुद्रमार्गे वर्षाला दहा हजार घोड्यांची आयात या बंदरावर होत असे. खूप पूर्वी तीन हात नाक्यावर खरोखरच तीन पोलीस हात दाखवून वाहतूक नियंत्रणाचे काम करीत असत. देवीचा नवस फेडताना काम झाले तर घंटा बांधेन, असे भक्तगण म्हणत.घंटा आणि टाळी हे नादाचेच दोन प्रकार आहेत. यामुळे या देवीचे नाव घंटाळी देवी असे पडले. घंटाळी परिसरात प्रचंड मोठे जंगल होते. हजरत सय्यद बहाउद्दीन व हजरत सय्यद बद्रुद्दीन ही नावे मामा भाच्यांची असून ते सुफी पंथाचे होते. इ.स. १७६० मध्ये डोंगर माथ्यावर त्यांच्या नावाचा दर्गा बांधला गेला. १९५८ पर्यंत नौपाडा हा भाग शहरात समाविष्ट नव्हता. नौपाडा भागाची स्वतंत्र ग्रामपंचायत होती.! पहिले सरपंच दादा पाटील हे होते. यांनीच गावदेवी मैदान वाचवले. माजिवडा ग्रामपंचायत ही आशिया खंडातली सर्वात मोठी म्हणजे श्रीमंत ग्रामपंचायत होती. खूप पूर्वी बाळकूमच्या वेशीवर एकमेव

तपासणी नाका होता. मालाच्या वजनासाठी तिथे एक मोठा काटा होता. इ.स. १९२४ मध्ये ब्रिटिशांनी बारा बंगल्याची वसाहत उभारली. पूर्वीच्या काळी बारा बलुतेदार ही ग्रामव्यवस्था होती. तोच आकडा स्मरून, महत्व जाणून ब्रिटिशांनी केवळ बाराच बंगल्यांची निर्मिती केली असावी. पोर्तुगीज आणि नंतर इंग्रज राजवटीत बाटवाबाटवी व धर्मांतराच्या कुठल्याही प्रसंगाला बळी न पडलेला स्वाभिमानी समाज म्हणून चेंदणी कोळीवाड्यातील बांधवांकडे अभिमानाने पाहिले जाते. कोळी महिला वेणीत चांदीचे दागिने माळीत म्हणून त्या विभागाला चेंदणी हे नाव पडले. विटावा इथे पेशव्यांच्या काळात विटांच्या भट्ट्या होत्या. राबोडी इथे रायबाची खूप मोठी विहीर होती. चरई भागात जुन्या काळी मोठ्या प्रमाणावर गुरे चरण्यासाठी येत असत म्हणून चरई. बाळकूम इथे बाळा नावाच्या माणसाची समृद्ध अशी आंब्याची बाग होती. मराठ्यांनी पोर्तुगीजांवर वचक बसवण्यासाठी 'महागिरी' नावाचे मोठे जहाज इथल्या खाडीत नांगरले म्हणून तो भाग महागिरी ओळखला जावू लागला.

वाचकरसिकांनो.. झाला का फेरफटका ठाणे शहराचा? आपल्या ठाण्याचे जुने-नवे संदर्भ आवडले ना? नक्की सांगा. बरेच वेळा काय होते मित्रांनो, आपल्याला परदेशातील स्थळांचे वर्णन पाठ असते, गुगल नामक विद्यापीठातून आपणास माहिती मिळते

देखील. पण मित्रांनो गुगलमधून मिळते ती माहिती आणि पुस्तकातून मिळते ते ज्ञान. ज्या शहरात आपण वर्षानुवर्षे रहात असतो, फिरत असतो त्या शहरातील स्थळांची संक्षिप्त माहिती देखील कित्येकांना नसते. अनेकजण नोकरी-व्यवसायाच्या कुंपणात इतके बंदिस्त झाले असतात की आपल्या आजूबाजूच्या जुन्या वास्तूंकडे, जुन्या संदर्भांकडे डोकावण्याची इच्छाच नसते. मात्र तुम्ही विखुरलेली माहिती एकत्र करून पुस्तक रूपाने त्यांना दिली तर ते नक्कीच वाचतात, त्यात रमून जातात. हे माझं निरीक्षण आहे.

एखाद्या शहराची इत्यंभूत आणि खरी माहिती मिळवणे, जमवणे हे अतिशय कष्टाचे, जिकरीचे काम असते. त्यासाठी अनेक संदर्भग्रंथांची, गॅझेट्सची पारायणे करावी लागतात. मात्र हे काम अतिशय आवडीने, संशोधकाच्या नजरेने आणि निरपेक्ष वृत्तीने करणारे ज्येष्ठ पत्रकार, लेखक आदरणीय श्री श्रीकांत वामन नेर्लेकर यांना दाद द्यावी तितकी थोडीच आहे. वयाच्या ८५ व्या वर्षी देखील स्वस्थ न बसता वाचकांना आपल्या लेखनाच्या माध्यमातून जे जे उत्तम देता येईल ते ते देण्याचा त्यांचा प्रामाणिक प्रयत्न असतो. २०१८ मध्ये महाराष्ट्र टाइम्सच्या ठाणे पुरवणीत वर्षभर त्यांचे एक सुंदर सदर चालू होते. त्या सदराचे नाव होते 'नावामध्ये दडलंय काय?' या सदरात जुन्या ठाणे शहरातल्या अनेक

स्थळांची दुर्मिळ माहिती, ओळख त्यांनी दिली होती. अनेक वाचकरसिकांनी या सदराचे मनापासून स्वागत केले होते. हे सदर संपल्यावर अनेक वाचकांनी त्यांना भेटून या एकत्रित लेखांचे सुंदर पुस्तक तयार करा असे आवर्जून सांगितल्यावर एकूण ४२ लेखांचे पुस्तक त्याच नावाने दि. १ मार्च २०१९ रोजी प्रकाशितही झाले. ग्रंथप्रसाराचा वसा जपणाऱ्या व्यास क्रिएशन्स या अग्रगण्य प्रकाशन संस्थेने नेर्लेकर गुरुजींचे हे पुस्तक प्रकाशित केले आहे. ठाणे शहरातील जुन्या वास्तूंचा परिचय, स्थळ महात्म्य, प्राचीनत्व, अनेक ऐतिहासिक संदर्भ, तसेच जोडलेल्या दुर्मिळ आठवणींचा गोफ श्री नेर्लेकर गुरुजींनी अतिशय रंजक पद्धतीने, सोप्या शैलीत या पुस्तकात गुंफल्याने पुस्तक वाचनीय झाले आहे. जुन्या ठाणे शहराच्या स्मरणरंजनात आपण सारेच गुंतून जातो, हरवून जातो. ठाण्यातील जुन्या पिढीतल्या वाचकरसिकांना हे पुस्तक नक्कीच भावेल, आवडेल. कारण त्यातले अनेक संदर्भ कदाचित त्यांना माहिती असतील. त्याचप्रमाणे आजच्या तरुणाईला, इतिहास प्रेमींना देखील हे पुस्तक मार्गदर्शक ठरेल यात शंकाच नाही.

तब्बल सहा दशके पत्रकारितेत व्रतस्थपणे काम करीत असताना ठाणे शहराच्या एकूणच सामाजिक, सांस्कृतिक आणि राजकीय घटनांचे सजग साक्षीदार, भाष्यकार म्हणून श्री नेर्लेकर गुरुजींकडे आदराने पाहिले जाते. गुरुजींचा परिचय मोठा आहे.

मुंबई तरुण भारत, महाराष्ट्र टाइम्स, पुढारी, नवशक्ती, विवेक, सन्मित्र, सागर अशा वृत्तपत्रातून पत्रकारिता. व्यास क्रिएशन्स या अग्रगण्य प्रकाशन संस्थेचे ते मार्गदर्शक असून धगधगते यज्ञकुंड- स्वातंत्र्यवीर वि. दा. सावरकर, जगन्नाथ तथा नानाशंकर शेठ, पावनतीर्थ सासवड आणि ठाणे : नगरपालिका ते महानगरपालिका अशी मौलिक पुस्तके त्यांच्या नावावर आहेत. उत्कृष्ट पत्रकारितेबद्दल गुरुजींना ठाणे भूषण पुरस्कार, दै. सन्मित्रचा स. पां. जोशी स्मृती पुरस्कार, आणि महाराष्ट्र शासनाचा कै. शि. म. परांजपे पुरस्कार लाभला आहे. दै. महाराष्ट्र टाइम्स मध्ये त्यांचे 'शतकाच्या उंबरठ्यावर' हे सदर विशेष गाजले.

व्यास क्रिएशन्सचे आधारस्तंभ नेर्लेकर गुरुजीं बरोबर अनेकवेळा विविध विषयांवर मुक्त गप्पा मारल्या आहेत. ६ मार्च २०२० रोजी गडकरी मध्ये व्यास क्रिएशन्सचा जो ज्येष्ठ महोत्सव भरला होता तेव्हा गुरुजींचे विचार ऐकता आले. मात्र गुरुजींचे हे शेवटचे दर्शन असणार आहे असा विचार देखील मनात त्यावेळी आला नव्हता. 'करोना' या महाभयानक विषाणूचे आगमन आपल्या देशात झाले. आणि सरकारने २६ मार्चपासून संपूर्ण भारतात लॉकडाऊन जाहीर केला गेला. अवघ्या विश्वाला गिळून टाकणाऱ्या याच करोनाने आमच्या गुरुतुल्य नेर्लेकर गुरुजींवर हल्ला केलाच. या विषाणूशी गुरुजी प्राणपणाने लढले देखील. मात्र

प्रयत्न अपुरे पडले. आणि अखेर दि. २० सप्टेंबर २०२०. वयाच्या ८६ व्या वर्षी आमचे गुरुजी दूरच्या प्रवासाला निघून गेले. या आघातातून व्यास क्रिएशन्सचा परिवार हळूहळू सावरत आहे.

इ.स. १९८८ मध्ये लेखक श्री दिगंबर जोशी यांनी लिहिलेले 'ऐतिहासिक ठाणे' ( जयजवान प्रकाशन ) हे खूप जुने पुस्तक माझ्या संग्रही आहे. यामध्ये ठाण्याच्या इ.स. ६३६ ते इ.स. १९८७ मध्ये घडलेल्या अनेक ऐतिहासिक, सामाजिक आणि सांस्कृतिक घटनांची तारीखवार संक्षिप्त माहिती दिली आहे. मात्र ती अतिशय त्रोटक आहे. त्याचप्रमाणे अगदी अलीकडे प्रकाशित झालेले इतिहास संशोधक कै हरिभाऊ शेजवळ यांनी लिहिलेले 'श्रीस्थानक ठाणे' हे पुस्तक देखील उपलब्ध आहे. या ग्रंथातील भाषाशैली बखरीच्या अंगाने जाणारी असल्याने अभ्यासकांना, संशोधकांना मोलाची आहे. या दोन्ही पुस्तकांच्या तुलनेत सर्वसामान्य वाचकांसाठी 'नावात दडलंय काय' हे पुस्तक अधिक माहितीपूर्ण आणि परिपूर्ण झाले आहे असे मला वाटते.

जुन्या ठाण्याची समृद्ध ओळख जाणून घ्यायची असेल तर प्रत्येक ठाणेकरांच्या संग्रही हे मौलिक पुस्तक असायलाच हवे. वाचकरसिकांनो, मला तर वाटते की एखाद्या निवांत संध्याकाळी एखाद्या तलावाच्या काठावर या सुंदर पुस्तकाचे वाचन करावे

आणि स्मरणरंजनाच्या तरंगामध्ये हलकेच रमून जावे. तुम्हाला काय वाटते?

( नावामध्ये दडलंय काय? ( लेख संग्रह), श्री वा नेर्लेकर, व्यास क्रिएशन्स, ठाणे )

# २४. ** लेण्यांच्या प्रदेशात **




*लेण्यांच्या प्रदेशात*

*मी शोधतो मौनरंग*

*इतिहासाच्या जीर्ण पोथींवर*

*सांडलेला, तरलेला ;*

*आणि भरून घेतो हृदयात खोलवर*

*श्वासांचा मंद दीपगंध*
*युगांयुगांपाशी थबकलेला. !*

*लेण्यांच्या प्रदेशात*
*सांडत जातो नीलरंग*
*मेघांच्या अनामिक पोकळीतला*
*क्षितिजापाशी पाझरलेला ;*
*आणि उमटत जातो नश्वर देहावर*
*एखाद्या अमूर्त कवितेसारखा..!!*

'अजिंठा'. आपल्या भारतवर्षाला पडलेलं एक सुंदर, अदभूत स्वप्नंच . कारण या लेण्यांमध्ये साकारलेली शिल्पकला, चित्रकला ही या पृथ्वीतलावरील माणसांनीं घडवलेली नसावी. एखाद्या परग्रहावरून आलेल्या मानव सदृश शक्तींनी अथवा अवकाशात स्वर्ग असलाच तर त्या स्वर्गातून आलेल्या यक्ष-यक्षिणींनी हे अदभूत वैभव उभे केले असावे इतकं अफाट, अविश्वसनीय. 'अजिंठा' म्हणजे माणसांमधील पराकोटी प्रतिभेचा उच्चतम आविष्कार. तब्बल दोन हजार वर्षांपूर्वी इथल्या निबिड अरण्यात अतिशय कठीण काळ्याभोर पाषाणातून हे शिल्पवैभव उभे करायचे तर काही दालनांमध्ये चित्रांचे प्रदर्शन भरवायचे.

कशासाठी? कोणासाठी? हे वैभव निर्माण करणारे शिल्पकार, चित्रकार कुठल्या विचारांनी झपाटून गेले असतील? इतकं सुंदर काम करून देखील शिल्पांपाशी, अथवा लेण्यांमध्ये कुठेही आपल्या नावाचा साधा नामोल्लेखही न करणारे ते कलाकार किती उच्च प्रतिभेचे, संस्कारांचे असतील. हे सर्व शब्दातीत आहे. अजिंठ्यापाशी आपण आलो की समोर साकारलेले कलावैभव फक्त आणि फक्त डोळ्यांनी प्राशन करायचे असते आणि जमलेच तर काळजात खोलवर रुजवायचे असते. तेव्हा तिथे व्यक्त करण्यासाठी शब्दांची गरजच पडत नाही.

वाघूर नदीच्या काठी विसावलेला लेण्यांचा समूह, अजिंठा हा कित्येक शतके अज्ञातवासाच्या खोल अंधारात जणू बुडून गेला होता. अनेकांच्या राजवटी आल्या, युद्धे, लढाया झाल्या मात्र अजिंठ्याकडे कोणाचंच लक्ष कसं गेलं नाही.? या लेण्यांचे भाग्य उजळले ते थेट इ. स.१८१९ मध्ये. इंग्रजांच्या राजवटीमध्ये एक ब्रिटिश अधिकारी कॅप्टन जॉन स्मिथ हा शिकारीसाठी या परिसरात आला होता. तेव्हा अगदी अवचितपणे इथल्या लेण्यांचा त्याला शोध लागला. इथली लेणी चिखलांनी पार बुजली होती. त्याने ती साफ केली आणि पाहिल्यावर त्याला फक्त वेड लागायचे बाकी उरले. त्याने आपल्या वरिष्ठांना सांगून हा ऐतिहासिक ठेवा इतक्या शतकानंतर पुन्हा प्रकाशात आणला. हा अनमोल ठेवा

विश्वविख्यात झाला. या वर्षी २०१९ मध्ये या घटनेला दोनशे वर्षे पूर्ण होत आहेत. आणि अशा पार्श्वभूमीवर ठाण्यातले इतिहास संशोधक कै. डॉ. दाऊद दळवी यांनी परिश्रमपूर्वक लिहिलेले "लेणी महाराष्ट्राची" ( ग्रंथाली प्रकाशन ) हे अदभूत पुस्तक पुन्हा वाचायला घेतले. २००८-२००९ साली या पुस्तकाने मला जणू भारावून टाकलं होतं. . इतके की या पुस्तकातील नोंदी, तपशिलानुसार मी दोन-तीन वर्षात दर महिन्यास एक लेणे या प्रमाणे महाराष्ट्रातील काही लेण्यांना प्रत्यक्ष भेटीही दिल्या. लेण्यांची स्केचेस काढली, कविता केल्या, पोटभर फोटो काढले. लेण्यांमधल्या नीरव शांततेने, अपार समाधानाने तसेच गौतम बुध्दाच्या तत्त्वज्ञानाने माझा पुरता ताबा कधी घेतला हे समजलेच नाही. अर्थात याचे सर्व श्रेय या पुस्तकाला जाते.

प्राचार्य डॉ दाऊद दळवी ( जन्म-१९३७- मृत्यू २०१६). एक व्रतस्थ व्यक्तिमत्व. शालेय जीवनापासूनच इतिहास या विषयामध्ये विशेष रुची. मुळातच संशोधन वृत्तीमुळे प्रत्यक्ष गडकिल्ले, लेण्या, प्राचीन मंदिरे इथे अफाट भटकंती केली आणि पुढे इतिहास या विषयाचे अध्यापन आवडीने केले. विद्यार्थ्यांना इतिहास विषयाबद्दलची रुची, आवड वाढवण्यासाठी त्यांना पुस्तकातील ज्ञानात बंदिस्त न करता प्रत्यक्ष किल्ल्यांवर, लेण्यांपाशी ते त्यांना नेत.तेथे शिकवीत. त्यामुळे ते समस्त विद्यार्थ्यांचे आवडते

प्राध्यापक होते. "प्राचीन इतिहास" या विषयामध्ये त्यांनी डॉक्टरेट केली आणि पार्ले महाविद्यालयात प्राध्यापक म्हणून रुजू झाले. मुंबई विद्यापीठात इतिहास व पुरातत्व अभ्यास मंडळाचे ते सदस्य होते. १९९८ च्या सुमारास ते ठाण्यातील ज्ञानसाधना कॉलेजचे प्राचार्य होते. कोकण इतिहास परिषदेची स्थापना त्यांनीच केली. १९९८ मध्ये निवृत्तीनंतर त्यांनी मराठीत, इंग्रजीत संशोधनात्मक विपुल लेखन केले. त्यांची एकूण सहा पुस्तके प्रकाशित आहेत. त्यापैकीच 'लेणी महाराष्ट्राची' हे पुस्तक २००४ मध्ये ग्रंथालीने प्रकाशित केले. आणि तिची द्वितीय आवृत्ती २०१४ मध्ये प्रकाशित झाली. त्या दोन्ही प्रकाशन समारंभास मी उपस्थित होतो. या पुस्तकाचे पुढे इंग्रजीमध्ये भाषांतर झाले. या पुस्तकाच्या आणि माझ्या लेणी भटकंतीच्या निमित्ताने डॉ दळवी सरांना भेटण्याचा अनेकवेळा योग आला. प्रत्येकवेळी त्यांच्याकडून खूप वेगळी आणि अदभूत  माहिती मिळायची. त्याबाबतीत मी भाग्यवान आहे. लेण्यांचे मी काढलेले काही फोटोही त्यांना आवडले होते. आयुष्याच्या अखेरच्या श्वासापर्यंत त्यांनी आपले तनमन इतिहास संशोधनाच्या कामाला अर्पिले होते. डॉ. दळवी सरांना राष्ट्रपती झाकीर हुसेन राष्ट्रीय पुरस्कार, ठाणे भूषण पुरस्कार आणि जनकवी पी. सावळाराम पुरस्कार या पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले.या ग्रंथाच्या मलपृष्ठावर 'लेणी' या विषयाचे संक्षिप्त चिंतन

आहे. " भारतात बाराशे लेणी आहेत. त्यापैकी आठशे लेणी महाराष्ट्रात आहेत.! इसवी सनाच्या आरंभकाळाच्या आगेमागे बौद्ध महाराष्ट्रात आले, त्यांना सह्याद्रीच्या डोंगरदऱ्या व त्यातील कातळ, लेणी खोदण्यास योग्य वाटले. त्यामधून एक नवा कलाविष्कार या भूमीत प्रकटला. नंतर हजार-बाराशे वर्षापर्यंत बौद्धांबरोबरच हिंदू व जैन पंथीयांनी महाराष्ट्रात सर्वत्र उत्तमोत्तम, विविध गुणदर्शी लेणी कोरली."

'महाराष्ट्राची लेणी' हा नुसता माहितीपर ग्रंथ नसून तो महत्वाचा दस्तऐवज आहे. कारण लेणी, मंदिरे  या विषयावर महाराष्ट्र शासनाच्या दर्शनिका विभागाकडून काही पुस्तके प्रसिद्ध झालेली आहेत. परंतु त्यामध्ये लेणी या विषयाची माहिती विखुरलेल्या स्वरूपात किंवा त्रोटक होती. मात्र महाराष्ट्राची लेणी हा ग्रंथ महाराष्ट्राच्या एकूणच प्राचीन, ऐतिहासिक आणि भौगोलिक स्थित्यंतरावर, जडणघडणीवर आणि मानवी संस्कृतीवर देखील महत्वपूर्ण भाष्य करतो. या ग्रंथात महाराष्ट्रातील जवळजवळ सर्वच लेण्यांचा अतिशय सुंदर असा परिचय दिला आहे, आणि जोडीला त्या त्या लेण्यांची चित्रे, सूची दिली आहे. हा जाडजूड ग्रंथ नुसता चाळला तरी डॉ दळवी यांच्या अफाट अभ्यासाची, डोळस भटकंतीची, आणि अथक परिश्रमाची वाचकाला प्रचिती येते.

प्रास्ताविकेत डॉ दळवी आपल्याशी संवाद साधतात. " महाराष्ट्रातील बौद्ध, हिंदू व जैन लेणी हा सांस्कृतिक व अध्यात्मिक परंपरेचा फार मोठा वारसा आहे व सुमारे पंधराशे ते दोन हजार वर्षांपासूनची ही लेणी सामाजिक, आर्थिक व अध्यात्मिक विकासाची केंद्रे होती. संपूर्ण महाराष्ट्र लेण्यांच्या रस्त्याने व पायवाटेने जोडलेला होता. प्रत्येक लेणीसंकुल परिसर घनदाट हिरवी वनश्री, झुळझुळ वाहणारे ओढे, नद्या व डोंगराच्या कुशीत खोदलेले होते. प्राचीन काळात लेणी, अध्यात्म आणि शिक्षणाची केंद्रे होती. वृद्ध व अनुभवी आचार्यांसोबत तरुण व होतकरू विद्यार्थीवर्गही लेण्यांच्या परिसरात आढळत होता. या प्राचीन वारशाचे जतन व संवर्धन करणे आवश्यक ठरले आहे."

हा प्राचीन वारसा आपण जपतो का? हा प्रश्न प्रथम आपण आपल्यालाच विचारला पाहिजे अशी आज परिस्थिती आहे. काही लेण्या तर झोपडपट्टीं आणि अनधिकृत बांधकामांच्या विळख्यात सापडून नष्ट होण्याच्या मार्गावर आहेत. तर काही लेण्यांच्या परिसरात पर्यटनाच्या नावाखाली गर्दुल्ले, दारुडे आणि मटकेवाले यांचा नंगानाच चालूच आहे. इथे संरक्षण यंत्रणा कुचकामी ठरत आहे.

या संग्राह्य ग्रंथाला डॉ. अरविंद प्र जामखेडकर, ( माजी संचालक पुरातत्व व वस्तुसंग्रहालय संचालनालय, महाराष्ट्र राज्य

) यांची अभ्यासपूर्ण प्रस्तावना आहे. डॉ. जामखेडकर प्रस्तावनेत म्हणतात. " महाराष्ट्राला ललामभूत झालेले दोन लेणीसमूह आहेत, ते म्हणजे अजिंठा आणि वेरूळ येथील लेणी. त्यांच्यावर स्वतंत्र प्रकरणे या ग्रंथात आहेत. दळवी यांचे पुस्तक वाचताना त्यांच्या निरीक्षणशक्तीचा आणि डोळसपणाचा प्रत्यय वारंवार येतो. गेल्या पाच-पन्नास वर्षात युरोपियन विद्वानांच्या बरोबरीने क्वचित प्रसंगी त्यांच्याहून अधिक सरस अशा प्रकारचे संशोधन भारतीयांनी केले असले तरी माझ्या माहितीप्रमाणे महाराष्ट्रातील बौद्ध, हिंदू व जैन लेणी यांचा साकल्याने विचार करून लिहिलेला मराठीतला हा पहिला ग्रंथ ठरेल.! पर्यटकाला अथवा अभ्यासकाला लेणी पहायची झाल्यास कोणत्या दृष्टीकोनातून लेण्यांकडे पहावे याचे दिग्दर्शन करावे हा ह्या ग्रंथाचा हेतू आहे."

या पुस्तकात लेण्यांच्या माहितीबरोबरच मूर्तिकला, शिल्पकला, शिलालेख, ताम्रपट, वीरगळ, कोकणात सापडलेली कातळचिन्हे यांच्यावर देखील महत्वपूर्ण लेख आहेत. भारतात बिहारमधील बाराबर येथे सर्वात पहिले लेणी खोदल्यावर शतकभरात ही लेणीसंस्कृती महाराष्ट्रात फोफावली ती इतकी की भारतातील एकूण लेण्यांच्या तब्बल ऐंशी टक्के लेण्या फक्त महाराष्ट्रात आहेत. याचे प्रमुख कारण म्हणजे इथला अग्निजन्य कणखर खडक,  जो लेणी घडवण्यास अतिशय उपकारक आणि

जास्त अनुकूल होता.  भाजे, कार्ला, बेडसे, कोंढाणे, गांधारपाले, ठाणाळे,कुडा, पन्हाळेकाजी, पांडवलेणी, जुन्नर समूह,पितळखोरे,, या लेण्यांच्या समवेत  आपल्या मुंबई जवळच्या कान्हेरी, घारापुरी, मंडपेश्वर, जोगेश्वरी, महाकाली, लोनाड  या लेण्यांची माहितीही दिली आहे. विशेष म्हणजे नव्वद टक्के लेणी ही प्राचीन व्यापारी मार्गावर खोदलेली आहेत. दानशूर व्यापाऱ्यांची नावे अनेक लेण्यांत कोरलेली आढळतात.

ही सर्व लेणी हीनयान आणि महायान कालखंडात खोदली गेली तसेच सातवाहन, कलचुरी, वाकाटक, चालुक्य आणि राष्ट्रकूट राजवटीत साकारली गेली. शिल्पकारांना त्या त्या राजांचा उदार आश्रय मिळाला हेही महत्वाचे. लेण्यांची मी भरपूर भटकंती केली. अपार मानसिक शांती लाभली. प्रत्येक वेळी मला तर त्या लेण्या खरोखरच भासल्या एखाद्या अमूर्त कवितेसारख्या ! 'महाराष्ट्राची लेणी' हे पुस्तकच एखादे अभिजात काव्य आहे इतके सुंदरपणे  नटले आहे.

( लेणी महाराष्ट्राची ( संशोधनात्मक),डॉ दाऊद दळवी, ग्रंथाली, मुंबई )

## २५. ** दमदार आवाजाची झुंजार कविता **




*माझे मराठीचे आई, वाटे यावे तुझ्या पायी*
*येथ जुलमाच्या झळा, होते अंगांगाची लाही*

*अनवाणी फिरताना, किती पायांना या खस्ता*
*जुलमाच्या जोड्याखाली, रोज चिरडे अस्मिता*

*अशा शिवबांच्या हाती, तुझ्या असाव्या समशेरी*
*तया पाहता रिंपुच्या, धडकी भरावी उरी*

*सरे कानडा काळोख, असा एक दिस यावा*
*प्राचीवर लालबुंद, सूर्य तेजाळ उगावा*

***माझे मराठीचे आई, दे ग क्रांतीची चिंगारी***
***हाती घेऊनिया प्राण, आम्ही ठेपलो संगरी***

अगदी स्पष्टपणे स्मरतंय. दहा वर्षांपूर्वी आमच्या ठाण्याच्या सहयोग मंदिरात एका मोठ्या काव्य संमेलनाचे आयोजन करण्यात आले होते. एकेक कवी आपली कविता सादर करीत होते. काही कवी आपली कविता गाऊन सादर करीत होते. अशा वेळी निवेदकाने 'आणि...आता आपल्या पुढे येत आहे गोव्याचा एक दमदार आवाज .. कवीचे नाव आहे विष्णू सूर्या वाघ'. त्या कवीच्या आगमनाला रसिकांच्या टाळ्या तशा माफकच पडल्या त्यावेळी...मात्र जेव्हा या कवीने माईकचा ताबा घेतला, थोडेसे प्रास्ताविक केले आणि...आणि नंतर आपल्या कविता सादरीकरणास प्रारंभ केला. त्या कविता, त्याचा आवाज, तो आवेश, तो जोम, ती ऊर्जा, तो बेभानपणा. सारंच विलक्षण. एक कविता..झाल्यावर अजून एक... मग पुन्हा एक.. फर्माईश... रसिक बेधुंद झाले, त्या कवीच्या पुरते प्रेमात पडले. टाळ्यांच्या कोसळणाऱ्या पावसात तो कवी चिंब न्हाऊन निघाला. विष्णू सूर्या वाघ यांनी आयोजकांची आणि रसिकांची पुरती मनं जिंकली. त्या घटनेचा मी साक्षीदार आहे. पुढे मुंबईमधील काही कार्यक्रमात

देखील तो योग आला.  मध्ये खूप वर्षे गेली आणि अगदी अकल्पितपणे या दमदार आवाजाची प्रत्यक्ष भेट झाली ती थेट गोव्यात.! २०१६ च्या काव्यहोत्र या अभिनव आणि आगळयावेगळया रेकॉर्डब्रेक कवीसंमेलनात. जुलैचा महिना. गोवा कला अकादमीच्या बाहेर कोसळणारा पाऊस आणि महाराष्ट्रातून आणि अन्य राज्यांमधून आलेल्या जुन्या-नव्या कवी मंडळींनी सादर केलेला नॉनस्टॉप अभूतपूर्व कवितांचा तडाखेबंद पाऊस. सारंच आगळंवेगळं. अर्थातच त्या सुंदर, कलात्मक आणि उत्तम आयोजनाचे सारे श्रेय जाते ते कवी विष्णू सूर्या वाघ यांच्या कल्पक नेतृत्वाला. प्रत्येक कवीचा यथोचित आदर-सत्कार-सन्मान केला गेला. एका कवीने केलेला दुसऱ्या कवीचा केलेला असा सन्मान. खूप दुर्मिळ गोष्ट ना? असो. त्या कार्यक्रमात या दमदार आवाजाशी मी प्रथमच बोललो, भेटलो. त्यावेळी मात्र ते कामाच्या आणि अन्य जबाबदाऱ्यांच्या ओझ्याखाली ते काहीसे थकलेले वाटले. काव्यहोत्राच्या अनेक आठवणी आहेत. त्याचवेळी या कवीचा "झिंजिर झिंजिर सांज" हा एक आगळावेगळा कवितासंग्रह मी आवर्जून घेतला. ज्यामध्ये या कवीच्या आयुष्याच्या, त्याच्या कवितांच्या अनेक छटा वाचायला मिळाल्या. त्यावेळी असेही ध्यान्यात आले की या कवीच्या साहित्याची म्हणावी तेवढी दखल मराठी साहित्यविश्वाने घेतलेली नाही. फक्त पंचावन्न वर्षांचे

आयुष्य लाभलेल्या या कवीला कुणी जाणून का घेतले नसावे? त्यांची उपेक्षा का झाली? असे प्रश्न अजूनही व्याकुळ करतातच.

मुंबईच्या अक्षर चळवळ प्रकाशनने विष्णू सूर्या वाघ यांचा "झिंजिर झिंजिर सांज" हा कविता संग्रह २१ नोव्हेंबर २००३ रोजी प्रकाशित केला. अक्षर चळवळचे सर्वेसर्वा आणि विष्णू सूर्या वाघ या कविमित्राचा काव्यप्रवास जवळून पाहणारे कवी अरुण म्हात्रे यांनी या संग्रहाला दीर्घ आणि अभ्यासपूर्ण प्रस्तावना दिली आहे. ती वाचल्यावर विष्णू यांच्या एकूण आयुष्याचा, कविता लेखनाचा समृद्ध कॅनव्हास पहायला मिळतो.

अरुण म्हात्रे एके ठिकाणी म्हणतात. " कवी विष्णू सूर्या वाघ हे केवळ कवी नाहीत. त्यांच्यापाशी कवी ग्रेसांचे आत्ममग्न हृदय आहे. आरती प्रभूंची खिन्न करणारी असोशी आहे. बोरकरांच्या दिलखुलासपणा आहे नि महानोरांची रोमँटिक निसर्गकविताही आहे. ते नाटकातले असल्यामुळे एक वरच्या पट्टीतला मोकळेपणा आहे आणि गोव्यातले असल्यामुळे एक समृद्ध, संपन्न नि सुखासीन अशी तृप्तताही त्यांच्यापाशी आहे. हे कॉम्बिनेशन भन्नाट आहे आणि ते बोरकर, पुलं, वसंत पोतदार, सुरेश भट आणि शांताबाई शेळके यांच्यासारखे दुर्मिळ आहे."

संग्रहातील एकूण सहासष्ट कवितांचा धांडोळा इथे घेणे अतिशय अवघड आहे. निसर्गाची लोभस चित्रे, नात्यांमधली नाजूक वीण, गोव्यातल्या मातीचा, कोकणी भाषेचा अस्सल गंध, लोकजीवन, लोकसंस्कृती, चालीरीती, समरसता, सामाजिक भान, जाणीव सारं सारं विष्णू सूर्या वाघ यांनी आपल्या कवितेत सुरेख पणे आणि अगदी सहजपणे टिपलं आहे. कवितेत अनेक ठिकाणी कोकणी शब्द वाचायला मिळतात. मात्र खास वाचकासाठी त्याचा अर्थ, त्याची पार्श्वभूमी, अन्य माहिती कवितेसोबत दिलेली आहे हे मला महत्वाचं वाटतं. उदा. 'सोनं ओवाळीच्या रुखा' म्हणजे पिवळ्या बकुळीच्या झाडाला !, 'काळोखाच्या पावणीला नक्षत्रांची तांग' म्हणजे अंधाराच्या लिलावात नक्षत्रांची बोली, एका कवितेत ' इंत्रुज' हा शब्द वाचायला मिळतो. मूळचा लॅटिन शब्द. पोर्तुगाल, स्पेन, ब्राझील, अर्जेंटिना या लॅटिन संस्कृतीचा प्रभाव असलेल्या देशात कार्निवल साजरा होतो. याच कार्निव्हलचं दुसरं नाव म्हणजे ' इंत्रुज'. कवी विष्णू यांचा भाषेचा अभ्यास किती सूक्ष्म होता याची प्रचिती येतेच. कविश्रेष्ठ बा भ बोरकर यांच्यानंतर अनेक गोमंतकीय कवींनी मराठीवर आपली वेगळी नाममुद्रा उमटवली त्यापैकी बोरकरानंतर ज्यांचे नाव घ्यावं लागेल ते म्हणजे कविवर्य विष्णू सूर्या वाघ यांचेच. कवी विष्णू हे फक्त कवीच नाहीत तर ते नाटककार, चित्रकार, अभिनेते पत्रकार, दिग्दर्शक, गायक,

लोकसाहित्याचे अभ्यासक, सामाजिक कार्यकर्ता, उत्तम व्याख्याते देखील होते. इतकं सारं संचित असून ते राजकारणात का शिरले? तिथे ते खरोखर रमले का? असा प्रश्न सहज पडतो. कवी विष्णू यांना अनेक पुरस्कारांनी गौरवण्यात आले. त्यापैकी बाकीबाब बोरकर पुरस्कार, मुंबई, यशवंतराव चव्हाण पुरस्कार, पुणे, गोमंतक मराठी अकादमी पुरस्कार, गोवा रत्न पुरस्कार, आचार्य प्र के अत्रे साहित्य पुरस्कार इत्यादी. गोमंतक या मराठी दैनिकाचे ते संपादक होते. गोवा विधानसभेचे ते उप सभापती होते. तिथेही ते झपाटल्यासारखे काम करीत होते. काव्यहोत्र-२०१६ नंतर काही महिन्यांनंतर त्यांना हृदयविकाराचा तीव्र झटका आला. . तब्बल अडीच वर्षे ते उपचार घेत होते. अखेर ८ फेब्रुवारी २०१९ रोजी दक्षिण आफ्रिकेतील केपटाऊन शहरात त्यांचे निधन झालं. एक झुंजार, दमदार आवाज कायमचा लुप्त झाला. कवी विष्णूंच्या त्या दोन ओळी अजूनही अस्वस्थ करतात.

काय तुझे अन माझे होते अद्वैताचे नाते
सरणावरच्या ज्वालेचे उरी अजुनी घुसते पाते

( झिंजिर झिंजिर सांज (कविता संग्रह), कवी: विष्णू सूर्या वाघ, अक्षर चळवळ, मुंबई )

# २६. *अंतरीच्या सौंदर्याचा परिमळू-

# झुळुकला अळुमाळू *




"जगाचं बरं-वाईट करण्याचं सामर्थ्य केवळ शब्दांतच असतं. म्हणून शब्दांचं पावित्र्य सांभाळायचं. स्वाध्याय, स्तोत्रपठण,

ग्रंथवाचन वगैरे प्रतिदिवशी याचसाठी व्रतभावनेनं करावं. मनाचं सामर्थ्य याचमुळे वाढतं. मनाची विकृती घालवतं. जिभेला कठीण शब्द उच्चारण्यास प्रयास पडत नाही. वाणी शुद्ध होते. म्हणून श्रीगणेशाला वंदन पहिलं. तो चित्तशुद्धी तर करतोच, विद्येचं वरदानही देतो."

" प्रख्यात ब्रिटिश नाटककार, कवी बेन जॉन्सन म्हणतो, " धर्म हा माणसांना हातोहात मूर्ख बनवतो " . महाभारताप्रमाणेच रामायण, वेद, उपनिषद, पुराणादी ग्रंथांतून मिळणारी नीतिशास्त्राची शिकवण ही 'धर्म' म्हणूनच मान्यता पावली आहे. जगात अनेक धर्म आहेत, परंतु धार्मिकता सारखीच आहे म्हणूनच सद्ग्रंथांना नीतीचं माहेर मानतात."

"मन अशांत असेल तर आपण फार बडबडतो. माऊलीनं म्हंटलं आहे ना 'शब्देविण संवादु'. जिथे शब्दच मौनावतात, तिथं मनाचा संवाद मनाशी सुरु होतो. अमृतानुभव शब्दांत सांगता येत नाही."

" अभ्यास म्हणजे 'आपलं मरण टळणार नाही. योग्य वेळी काळ येईल. घेऊन जाईल'. हे ज्ञान झाल्यावर मरणाचा अभ्यास करावा. आपल्या अवतीभवती जातीजमातींच्या असंख्य तलावांचं पाणी वेगवेगळं आहे. प्रत्येकाची चव वेगळी. मात्र शीतलता आणि

जलतत्त्व एकच ! हे लक्षात न घेता 'आमच्या काठावर आलात तर याद राखा !' असा दम भरणारे कुठल्या भविष्याच्या भरवश्यावर जगत असतात? आपण काय करतो? कैद्यापेक्षा कुलुपांचीच काळजी घेतो. गुन्हेगारांना जगविण्याचा हा अट्टहासच आपल्याला सर्वनाशाकडे घेऊन चाललाय - युद्ध न करता ! "

" ज्ञानेश्वर माउलींना त्यांच्या जातभाईंनीच छळलं, जिणं नकोसं केलं होतं, पण माउलींनी एकही ओळ तक्रारीची लिहिली नाही. आपण हा संयम लेखनचातुर्यात दाखवायला हवाय, तटस्थपणे जगता येत असेल तरच अलिप्तपणे लिहिता येतं. शहाणपणाला चातुर्याचा वर्ख लागल्यावर लेखन वाचनीय होतं !

" अधिकाराची ताकद आणि त्यातील फोलपणा अनेकांना कळतो, पण तेव्हा डोळे मिटायची वेळ आलेली असते. आपल्या अधिकाराचा स्वात्विक वापर करावा, असं अध्यात्मशास्त्र सांगतं, पण तसं दिसतं कुठं? भले भले साधुसंतही आपल्या अधिकाराचा गैरफ़ायदाच घेताना दिसतात. या स्वार्थापासून सुटका कशी करून घ्यायची? परमार्थ करून ! हे सारं कठीणच आहे, असंच वाटेल... आपण चांगल्याची सुरवात करावी. शुभकार्यास मूहुर्ताची गरज नसते !"

वाचक रसिकांनो, तुम्हाला हे माहिती आहे का? प्राचीन काळी आपल्या भारताचे नाव 'जंबुव्दिप' असं होतं. 'पद्मपुराण' या प्राचीन ग्रंथात याचा उल्लेख आहे. हे 'जंबुव्दिप' म्हणजे ' 'Rose Apple island', म्हणजेच हिंदूस्तान, आपला भारत. क्षार, दुग्ध आणि मधु या तीन महासागरात तरंगणारे हे अंडाकृती विश्व म्हणजे नवनिर्मितीची कूस आहे आणि हीच कूस उजळवून टाकणारे एक प्रगल्भ ऊर्जा केंद्र, शक्ती केंद्र. आणि हेच शक्ती केंद्र म्हणजे आपला समृद्ध भारत. इथल्या समृद्ध, पवित्र भूमीवर जणू ईश्वराचे वास्तव्य झाले आहे. तसेच इथल्या सुजलाम सुफलाम भूमीला अलौकिक अश्या अध्यात्मिक शक्तीचा परीस स्पर्शही झाला आहे. अशा भूमीमध्ये परकीय शत्रूंपासून रक्षण करणाऱ्या पराक्रमी पुरुषांबरोबरच संत-महात्म्यांचा, तत्वचिंतकांचा जन्म झालेला आहे. पराक्रम आणि अध्यात्म यांचा अनोखा संगम या भूमीत आपणास पहायला मिळतो. वेद-पुराणांची निर्मिती इथेच झाली आणि रामायण-महाभारतासारखी अलौकिक प्रतिभेची महाकाव्येही इथेच प्रसवली. ज्ञानदेव, चक्रधर स्वामी, एकनाथ, तुकाराम, नामदेव, समर्थ रामदास, मीराबाई, कबीर, तुळशीदास, रामकृष्ण परमहंस, विवेकानंद, संत गाडगेबाबा तर काही सुफी संतांनी आपल्या वाणीतून, सकस लेखनातून केवळ हिंदुस्तानालाच नव्हे तर अवघ्या विश्वाला त्या त्या कालखंडात

जीवनाचे सखोल तत्वज्ञान सोप्या भाषेत समजावून दिले, समाज प्रबोधनाचे महत्वाचे कार्य त्यांनी केले. महाराष्ट्र तर संतांची भूमी. इ.स. १२९० मध्ये संत ज्ञानेश्वरांनी ज्ञानेश्वरी लिहिली. त्यास अनेक वर्षे लोटली तरी आजही अस्थिरतेच्या काळात त्या ज्ञानेश्वरीचे महत्व तूसभर देखील कमी होत नाही. आज एकविसाव्या शतकात देखील ज्ञानेश्वरीतील ओळींचा अर्थ अनेक विद्वानांना, समीक्षकांना दरवेळी नव्याने आकळतो. यातच ज्ञानेश्वरीचं मोठेपण लपलेलं आहे. नामदेव ज्ञानेश्वरीचे वर्णन करताना म्हणतात " छपन्न भाषेचा केलासे गौरव I भवार्णवी नाव उभारली II ". या थोर संतांनी लिहिलेल्या वचनांमध्ये वेदान्ताचे मर्म सापडते. ईश्वरी चिंतनाने भारावलेली संतांची वाणी कधीही शिळी होत नाही. प्रत्येक युगातील माणसांना संतांचे साहित्य अपार समाधान तर देतेच पण जगण्याचे मर्म सांगते, मार्गदर्शन करते आणि चांगला माणूस होण्यासाठी त्यांची लेखणी जणू आपल्यासाठी झिजते. आयुष्याच्या विविध टप्प्यांवर ज्ञानेश्वरी वाचावी. तिचे नुसते पठण अथवा पारायणे नकोत तर तिचे आचरण करावे इतकी ती थोर आहे.

संतसाहित्याचा डोळसपणे अभ्यास करणारे अनेक विद्वान, तज्ञ लेखक मंडळी रोजच सकसपणे काही लिहीत असतात. त्याचे पुढे मौलिक ग्रंथ होतात. याच लेखकांच्या मांदियाळीतले एक

महत्वाचे लेखक, तेही आपल्या ठाण्यातलेच. ज्यांना खऱ्या अर्थाने आयुष्याचे मर्म व वर्म पुरेपूर समजले आहे. समाजात राहूनही व्रतस्थपणे तर कधी अलिप्तपणे सभोवतालच्या सद्य परिस्थितीवर नेमके भाष्य करणारे लेखक, कवी, समीक्षक, भाष्यकार श्री अरविंद दोडे यांचे "अंतरीचे सौंदर्य" हे पुस्तक वाचक रसिकांनी जरूर वाचलेच पाहिजे असे आहे. याचे कारण असे की श्री दोडे यांनी संतसाहित्यातल्या वचनांचा, त्यातील तत्वांचा, विचारधनाचा नीटसा मागोवा घेऊन आजच्या अस्थिर काळात देखील त्याचे अनन्यसाधारण महत्व कसे आहे हे या पुस्तकात त्यांनी अधोरेखित केले आहे. संतांच्या वचनांबरोबरच परदेशातील काही तत्वचिंतकांच्या विचारधनाचा देखील ऊहापोह या पुस्तकात केला आहे. श्री दोडे यांची लेखन शैली सोपी आणि प्रभावशाली असल्याने अध्यात्म सारखा अवघड विषय अनेक सुंदर दाखल्यांबरोबरच त्यांनी ललितच्या अंगाने फुलवला आहे. हे पुस्तक चौपन्न ललित लेखांनी साकारले आहे. यातले बरेचसे लेख यापूर्वी मुंबई तरुण भारत, नवशक्ती, सकाळ मध्ये प्रकाशित झालेत.

लेखक अरविंद दोडे यांचा लेखन प्रवास अर्थातच कवितालेखनाने झाला. कविता, कथा, ललित, बालसाहित्य, संतसाहित्य याप्रकारात श्री दोडे यांनी विपुल लेखन केले असून

आत्तापर्यंत त्यांची एकूण तीस पुस्तके प्रकाशित झाली आहेत. मूळचे मालेगाव, नाशिक इथले. श्री दोडे नोकरीनिमित्ताने ठाणेवासीय झाले. जॉन्सन कंपनीत एकूण सोळा वर्षे, पुढे तरुणभारत इथे दहा आणि नंतर सुदर्शन प्रकाशन संस्थेत दहा वर्षे त्यांनी नोकरी केली. काही वर्षे बिर्ला कॉलेज इथे अध्यापन देखील केले. 'ललित' सारख्या दर्जेदार मासिकात त्यांनी बरीच वर्षे 'लक्षवेधी पुस्तके' या सदरात लेखन केले. सध्या सामना या वृत्तपत्रासाठी ते निवडक पुस्तकांची परीक्षणे करतात. श्री दोडे यांच्या 'अंतरीचे सौंदर्य' या पुस्तकाला म.ग्र.सं.ठाणे यांचा वा.अ. रेगे पुरस्कार हा मानाचा पुरस्कार लाभला आहे. 'अज्ञात ग्रहावर' या पुस्तकाला म.सा.प. पुणे यांचा उत्कृष्ट बालकादंबरी म्हणून पुरस्कार लाभला आहे. तसेच दोडे यांना ठाणे नगररत्न, ठाणे नवरत्न पुरस्कारांनी गौरविले आहे. मुंबई आकाशवाणी इथेही श्री दोडे यांच्या साहित्याचे वाचन प्रसारित झाले आहे.

श्री अरविंद दोडे आपल्या मनोगतात म्हणतात " संतप्तपणाला तृप्तीचं, मर्त्याला अमृताचं आणि दुरितांना देवत्वाचं दान ज्ञानदेवांनी याच भाग्यभुमीत दिलं. मोहिनीराजाचं दर्शन घेतलं. प्रणाम करून 'गीते' सारखा विश्वमान्य ग्रंथ मराठीत सामान्यांना कळावा म्हणून विस्तारासाठी घेतला. केलेलं कुठं सांगावं लागलं नाही. सांगितलेलं करून दाखवलं त्यांनी. पसायदान मोजक्या शब्दात सांगितलं

आणि कालांतरानं विश्वप्रार्थना म्हणून ती घरोघरी पोहोचली. सौंदर्यमय, नाविन्यपूर्ण आणि प्रेमळ जीवन या त्रिगुणात्मक भावनेला जगप्रसिद्ध तत्वज्ञ प्लेटोनं 'प्रेम; म्हंटलय. त्यावरून ' प्लेटोनिक लव्ह' ही उक्ती विख्यात झाली. जाणकार या कल्पनेस 'अशारीर प्रेम' म्हणतात. ज्ञानेश्वरीत असं प्रेम पानोपानी गच्च भरलंय.! कुरुक्षेत्राला तीर्थक्षेत्र करण्याचं काम केवळ नामस्मरणानं येतं. ! हे शब्दाविना संवाद ऐकू येण्याचं भाग्य लाखात एखाद्याचाच कुंडलीत असतं.  तसा तर कैवल्याचा अधिकार असतो प्रत्येकालाच... मिळवावा लागत नाही. हे अंतरीचं सौंदर्य कुणालाही हवंहवंसं वाटेल, अशी खात्री आहे.! "

होय अगदी खरे आहे. अंतरीच्या सौंदर्याचा परिमळू वाचकरसिकांच्या मनात नक्कीच दरवेळ अशी खात्री आहे.

( अंतरीचे सौंदर्य ( अध्यात्मिक ), अरविंद दोडे, सुदर्शन प्रकाशन, मुंबई )

दिवसातून दोन तास पुस्तक वाचणे आणि तेवढाच वेळ फ़ेसबुक किंवा whatsapp वरच्या पोस्ट्स वाचणे यात नेमका काय फ़रक असतो? असतो का? दोन्हीही वाचनच ना!

रोज एका गार्डनला प्रदक्षिणा घालत आठ-दहा किमि. चालण्याऐवजी रोज तेवढाच वेळ एका दिशेने चालत राहिलं तर माणूस पाच महिन्यांत मुंबईहून दिल्लीला पोहोचेल. नेमका हाच फ़रक फ़ेसपुस्तक आणि पुस्तक यांच्यामधे असतो.

पुस्तक वाचन एखाद्या मोठ्या गुंतवणुकीसारखे असते जे तुम्हाला श्रीमंत करत असते. Whatsapp, facebook मधले ज्ञान खिशात बाळगलेल्या चिल्लरसारखे असते. त्याच्या आधारे तुम्ही फ़ार तर वेळ मारून नेऊ शकता.

पुस्तक वाचन तुम्हाला पुढे नेते, प्रगतीच्या वाटेवर नेते. एका दिशेला नेते. एका उंचीवर नेते. पुस्तके वाचणारे लोक इतरांहून अधिक शहाणे असतात. शहाणे होतात. वाचनात सातत्य असणारे अधिकाधिक शहाणपण मिळवत रहातात.

अनुभवाहून उत्तम पुस्तक नाही असे म्हटले जाते. पण शेवटी पुस्तक म्हणजे काय? कोणाचे तरी अनुभवच ना? असे दुसऱ्याचे अनुभव वाचून माणूस शहाणा होतो. पुढच्याच्या ठेचा मागच्याला

शहाणे करून सोडतात. मग ते पुस्तक दुसऱ्या देशातील लेखकाचे असो वा दुसऱ्या काळातील लेखकाचे. शहाणपण गॅरंटीड.

**वाचत रहा. ग्रंथानंद घेत रहा.**

www.esahity.com

esahity@gmail.com